cmyk

## संपादकीय

### नाराजी नाट्याचा अध्याय कुठे थांबणार ?

महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असला, तरी त्यावरून निर्माण झालेले नाराजी नाट्य लवकर संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. विधानसभा निवडणुकीत युतीने २३० जागांपर्यंत मजल मारल्यामुळे खरेतर या नाराजांची नाराजी किती प्रभावी ठरणार, असा प्रश्न पडू शकतो. तथापि, यामध्ये छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार यांसारख्या नेत्यांचा समावेश असल्याने त्याची दखल घेणे सरकारला क्रमप्राप्त ठरेल. यातील सर्वाधिक लक्षवेधक नाराजी ही भुजबळांची ठरावी. जहाँ नही चैना, वहाँ नही रहना, अशा शब्दांत भुजबळ आपल्या नाराजीला वेगळी वाट करून देताना दिसतात.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३६ | गुरूवार, दि.१९ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


### सोन्याच्या दरात आज पुन्हा झाली घट

मुंबई : कमोडिटी बाजारात पुन्हा एकदा सोन्या–चांदीच्या दरात सुस्ती आली आहे. अमेरिकेत व्याज दरात घट होण्याची शक्यता असल्याने ट्रेडर्स आधीच सतर्क झाले आहेत. त्यामुळे बुधवारी वायदे बाजारात ट्रेंडिग कमजोर असल्याचे पाहायला मिळत आहे. त्याचाच परिणाम सोन्या–चांदीच्या दरात होताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोनं २,६६० पर्यंत घसरले आहे. वर सोनं ७७ हजारापर्यंत पोहोचले आहे. फेडरल बँकेच्या व्याज दराबाबत निर्णय होणार आहे. दरात ०.२५ टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. लग्नाचा सीझन असल्याने मागणी वाढली आहे.

# हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीनची विक्री

## राज्यात पुरेशी सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रे सुरु करा, किसान सभेची मागणी



मुंबई । प्रतिनिधी

सध्या राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण हमीभावापेक्षा कमी दरानं सोयाबीनची विक्री होत आहे. त्यामुळं शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना देखील आक्रमक झाल्या आहेत. राज्यातील खरिपाचे महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीनला सरकारच्या धोरणामुळे आधार भावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. त्यामुळे सरकारने राज्यात पुरेशी सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करावी अशी मागणी किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केली आहे.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची मते मिळावीत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार सोयाबीनला ६००० रुपये भाव देईल अशी घोषणा केली होती. सोयाबीन खरेदीसाठीचा मॉईश्चर निकष सुद्धा १५ टक्क्यापर्यंत वाढवण्याची घोषणा करण्यात आली होती. तत्पूर्वी मोदी पान २ वर

### खासगी व्यापाऱ्यांकडून ४००० रुपये प्रतिक्किंटल दराने सोबायीनची खरेदी

राज्यात काही ठिकाणी हमीभावाप्रमाणे सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. तरी सर्व बाजार समित्यांवर ही केंद्रे नसल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन वाहून नेण्यासाठी मोठा खर्च होत आहे. वाहतुकीचा खर्च न परवडल्यामुळे शेतकरी आपले सोयाबीन खासगी व्यापाऱ्यांना ४००० रुपये प्रतिक्किंटल प्रमाणे विकत आहेत. राज्य व केंद्र सरकारने या पार्श्वभूमीवर तातडीने हस्तक्षेप करून राज्यभरातील सर्व बाजार समित्यांमध्ये सरकारी हमीभाव खरेदी केंद्रे सुरु करून शेतकऱ्यांना ताबडतोब दिलासा द्यावा अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.

### पंतप्रधानांच्या आश्वासनाचे काय झाले?



राज्यात सोयाबीनला हमीभाव द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. हीच बाब लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका भाषणात 'सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सोयाबीनला किमान आधारभूत किंमत सहा हजार रुपये प्रति क्किंटल देण्यात येईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. मात्र, तेवढा दर मिळत नाही. याच मुद्यावरुन किसान सभेने टीका केली आहे.

## सरपंच देशमुख कुटुंबियांसाठी माजलगावात सर्वपक्षीय मदत फेरी

### आ.सोळंके यांचा पुढाकार





माजलगाव । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयाकरिता माजलगावकरांच्या वतीने हात मदतीचा अभियानांतर्गत सर्वपक्षीय मदत फेरी आज दि. १८ डिसेंबर रोजी आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत काढण्यात आली. या फेरीमध्ये एकविस लाख रुपयांची मदत जमा झाली आहे.

केज तालुक्यातील मस्सा जोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घुण हत्या केल्याची घटना घडलेली आहे. त्यामुळे देशमुख कुटुंबीयांवर संकटाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना या संकटातून सावरण्याची ताकद मिळो व माणुसकीचे दर्शन घडवत माजलगावकरांच्यावतीने मयत सरपंच पान २ वर

# भाजपसोबत जा, भुजबळ समर्थकांचा एकमुखी सुर

## एक्सवर पोस्ट करुन भुजबळांनी मांडली भुमिका; कार्यकर्ता बैठकीला राज्यभरातील समर्थक



नाशिक । प्रतिनिधी

छगन भुजबळांनी भाजपसोबत जावे, अवहेलना करणाऱ्या पक्षात राहू नये असा एकमुखी सुर नाशिक येथील कार्यकर्ता बैठकीत भुजबळ समर्थकांनी काढला. दुसरीकडे छगन भुजबळ यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत आपली भूमिका मांडली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने राज्य मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने ज्येष्ठ नेते छगन भुजबळ नाराज झाले आहेत. प्रसारमाध्यमांसमोर त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली आहे. त्यातच आता छगन भुजबळांनी भाजपसोबत जावे, अवहेलना करणाऱ्या पक्षात राहू नये अशी मागणी समर्थकांनी नाशिकच्या संघर्ष सभेत करण्यात आली आहे. दुसरीकडे छगन भुजबळ यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत आपली भूमिका मांडली आहे. हा लढा हा मंत्रीपदाचा नाही तर अस्मितेचा आहे अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

येवला संपर्क कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन संवाद साधला. यावेळी बोलताना आपण पान २ वर

## ओबीसी जर एकवटला तर कोण अजितदादा?

### लक्ष्मण हाकेंनी डागली तोफ; मनोज जरांगेंनाही इशारा

मुंबईः तुम्ही ओबीसी विरोधी आहात या प्रश्नाला अजितदादांना सामोरे जावे लागणार आहे. भुजबळांवरती अन्याय झाला आहे असे मानणारे आम्ही आहोत. ओबीसी जर एकवटला तर कुठला अजितदादा आणि कोण अजितदादा? असा टोला ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लगावला.

यावेळी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, भुजबळांवर निश्चित अन्याय झाला आहे. अन्याय का केला गेला आहे आणि कोणाकडून केला गेला आहे याचे संशोधन होणे गरजेचे आहे. ओबीसींच्या बाजूने त्यांनी ठाम भूमिका घेतली आहे, असे हाके म्हणाले. ओबीसी मधूनच आम्हाला आरक्षण पाहिजे अशी बावळट मागणी जर जरांगे करत असतील. जरांगेची जशी मागणी असेल त्यापेक्षा दुप्पट ॲक्शन



ओबीसीची असेल, असा इशारा हाके यांनी दिला.

## बीडचे राजकारण तापणार; शरद पवार लवकरच दौऱ्यावर

### मस्साजोगमध्ये देशमुख कुटुंबियांची भेट घेणार; काय बोलणार याकडे लक्ष

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे पडसाद हिवाळी अधिवेशनात उमटले. राष्ट्रवादीचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी तर मंत्री धनंजय मुंडे यांचे सहकारी वाल्मिक कराड यांचा या प्रकरणात थेट उल्लेख केल्याने बीडच नाही तर राज्याचे राजकारण तापले आहे. आता शरद पवार सुद्धा बीड दौऱ्यावर येत आहे. २१ डिसेंबर रोजी पवार हे मस्साजोग येथे देशमुख कुटुंबियांची भेट घेणार आहेत. त्यावेळी ते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष



लागले आहे.

सध्या दिल्लीसह राज्यात हिवाळी अधिवेशन सुरू आहे. बीडचे खासदार पान २ वर

### असा आहे पवारांचा दौरा

शरद पवार हे २१ तारखेला सकाळी मसजोग गावाला येणार आहेत. २० तारखेला ते छत्रपती संभाजीनगरला मुक्काम करणार आहेत. दुसऱ्या दिवशी बीडला येऊन ते देशमुख कुटुंबाची भेट घेत सांत्वन करणार आहेत. या खून प्रकरणाची पाळंमुळे कुठपर्यंत आहेत याचा शरद पवार आढावा घेणार आहेत, अशी माहिती खासदार बजरंग सोनावणे यांनी दिली.

### विष्णु चाटेला अटक

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष विष्णु चाटेला पोलिसांनी अटक केली असून संतोष देशमुख खुन प्रकरण आणि खंडणी प्रकरणात तो आरोपी आहे. सात पैकी चार जणांना आतापर्यंत अटक केली असून तिघेजण अजुन फरार आहेत.

## अजितदादांच्या मंत्र्यांना मिळणार हे खाते

### यादी फुटली; शिवसेनेचेही होणार समाधान

नागपुर । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप लवकरच होणार असून, राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थ आणि नियोजनसह काही जुनी खाती आणि राज्य उत्पादन शुल्क हे नवीन खाते मिळण्याची शक्यता आहे. अजित पवार अर्थ खातं सांभाळतील, तर शिवसेनेला जुनीच खाती मिळण्याची शक्यता आहे. महत्त्वाची खाती कुणाला मिळतील याकडे सर्वांचे लक्ष लागले पान २ वर



### कुणाला कोणते खाते मिळणार?

अजित पवार–अर्थ व नियोजन, धनंजय मुंडे–अन्न व नागरी पुरवठा, मकरंद पाटील–सहकार, आदिती तटकरे –महिला व बालकल्याण, दत्तामामा भरणे–कृषी, हसन मुश्रीफ –वैद्यकीय शिक्षण

### शिवसेनेला जुनीच खाती?

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला जुनीच खाती दिली जाणार असल्याचं सांगितलं जात आहे. शिंदे यांच्याकडे नगरविकास खातं असणार आहे. त्यासोबत त्यांच्याकडे आणखी कोणते खाते असणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. शिवाय गृह खातं कुणाकडे जाणार हे सुद्धा अजून गुलदस्त्यात असल्याने त्याकडेही सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## शरद पवार शांत, याचा अर्थ वादळ निर्माण होणार

### शिवसेना नेत्याचे मोठे वक्तव्य; मविआला झटका बसण्याची शक्यता



नागपुर । प्रतिनिधी

शरद पवार शांत आहेत, याचा अर्थ वादळ निर्माण होत आहे, असे वक्तव्य शिवसेनेचे नेते आणि प्रवक्ते व मंत्री संजय शिरसाट यांनी केले. आहे. संजय शिरसाट यांनी केलेल्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महाविकास आघाडी राहिली नाही, शरद पवार काय निर्णय घेतील हे हिवाळी अधिवेशनादरम्यान दिसेल, असेही संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे यांनी नाना पटोले यांची भेट न घेता देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, पान २ वर

## गेटवे ऑफ इंडिया दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू

### एलिफंटाकडे जाताना नेव्हीच्या बोटीने दिली धडक

मुंबई । प्रतिनिधी

गेटवे ऑफ इंडिया दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेटवे ऑफ इंडिया दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. एलिफंटाकडे जाताना बोट उलटली पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१८ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,४११ | २,९३० | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड : ५१.५० क्विंटल | १,९१० | ३,१७६ | २,३४९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,६५० | ८,५०० | ८,०७५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,९०१ | ७,५६० | ६,८२० |
| बाजरी: ९.५० क्विंटल | २,४०० | ४,३०१ | ३,१६६ |
| मुग : ७.०० क्विंटल | ६,२०० | ७,६०० | ६,९४० |
| सोयाबीन: ४०.५० क्विंटल | ४,००० | ४,०५० | ४,०१६ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,१५१ | ५,६०० | ५,३७५ |

## आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात बीड मतदारसंघातील मांडले महत्वाचे प्रश्न

### शहरातील पाणीपुरवठा, बंधारा, टुकूर प्रकल्पाबाबत केल्या मागण्या



नागपूर । प्रतिनिधी

बीड मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाच्या आणि लोकांच्या दृष्टीने उपयुक्त परंतु प्रलंबित असलेले प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१८) रोजी नागपूर येथे सुरू पान २ वर

### बिंदुसरा नदीवरील बंधारा कम पूल

बीड जिल्ह्यात पावसाचे प्रमाण हे अनियमित असते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशी परिस्थिती बीडमध्ये असते. दुष्काळात तर साहजिकच पाणीपातळी खालावते आणि शहरातील व परिसरातील विहीर आणि बोअर कोरड्या पडतात. परंतु मुबलक पाऊस पडल्यानंतर देखील पाणी अडविण्यात नसल्याने त्या पाण्याचा उपयोग होत नाही. शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा बांधण्याबात गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा आणि मागणी सुरू आहे. हा पूल कम बंधारा बांधल्यानंतर एखाद्या वेळी पाऊस जरी पडला नाही, तरीदेखील अडविलेल्या पाण्यामुळे ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरातील विहीरींना आणि बोअरला पाणीसाठा उपलब्ध राहील. या बंधार्याची मंजुरी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे या महत्वाच्या कामाला शासनाने मंजूरी आणि निधी उपलब्ध करून द्यावा.

### टुकूर साठवण तलाव

बीड मतदारसंघात टुकूर साठवण तलाव प्रकल्पाची २००३ साली मंजुरी झालेली आहे. परंतु या परिसरातील गावांचा या प्रकल्पाच्या भूसंपादनाला विरोध असल्यामुळे हा प्रकल्प इतक्या वर्षांपासून रखडलेला आहे. यातून मार्ग म्हणून साठवण तलावाच्या ऐवजी नदीवर ४ निम्न पातळी बंधारे जर बांधले तर तितक्याच क्षमतेची पाणी साठवणूक होणार आहे. यासोबतच तलाव प्रकल्पाच्या तुलनेत अर्ध्या निधीतच हे काम होईल त्यामुळे शासनाचे पैसे वाचतील आणि महत्वाचा प्रश्न मार्गी लागेल. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

### बीड शहर पाणीपुरवठा

बीड शहराची लोकसंख्या ३ लाख आहे. बीड शहरात सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा योजनेची यंत्रणा ही अनेक वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे बीड शहराला पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. परंतु बीड शहराला पाणी न मिळण्याचे नेमके हे नाही, बीड शहराच्या आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी अटल अमृत योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपये इतकी वीजबिल थकबाकी असल्याने या योजनेसाठी महावितरण कडून नवीन कनेक्शन दिले जात नाही आणि परिणामी बीड शहराला १५ ते २० दिवसांतून एकदा पाणी पुरवठा होतो, तेही पाणीसाठा मुबलक असताना आणि यंत्रणा तयार असताना. त्यामुळे शासनाने नगरपालिकेकडे असलेले थकीत वीजबिल भरण्यासाठी विशेषबाब म्हणून निधीची तरतूद करावी.

cmyk

## अग्रलेख

# नाराजी नाट्याचा अध्याय कुठे थांबणार ?

महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असला, तरी त्यावरून निर्माण झालेले नाराजी नाट्य लवकर संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. विधानसभा निवडणुकीत युतीने २३० जागांपर्यंत मजल मारल्यामुळे खरेतर या नाराजांची नाराजी किती प्रभावी ठरणार, असा प्रश्न पडू शकतो. तथापि, यामध्ये छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार यांसारख्या नेत्यांचा समावेश असल्याने त्याची दखल घेणे सरकारला क्रमप्राप्त ठरेल. यातील सर्वाधिक लक्षवेधक नाराजी ही भुजबळांची ठरावी. जहाँ नही चैना, वहाँ नही रहना, अशा शब्दांत भुजबळ आपल्या नाराजीला वेगळी वाट करून देताना दिसतात.

वास्तविक नव्या सरकारच्या मंत्रिमंडळात भुजबळांचा समावेश निश्चित मानला जात होता. परंतु, अजितदादांना साथ देणाऱ्या भुजबळांना वगळण्याचा निर्णय काहीसा अनाकलनीय ठरावा. पुतण्याच्या बंडाला दिलेला अंतस्थ पाठिंबा व जरांगे फॅक्टर या दोन गोष्टी यास कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. स्वत: भुजबळ यांनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्याला मंत्रिपद देण्यास राजी होते, असे सांगत अप्रत्यक्षपणे अजितदादांवर निशाणा साधला आहे. आत्ताचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांसारखी मोजकीच मंडळी चालवत असल्याकडे भुजबळ लक्ष वेधताना दिसतात. यासंदर्भात अजितदादांनी आत्तापर्यंत तरी मौन बाळगल्याचे दिसून येते. तथापि, भुजबळांचा एकूणच पवित्रा पाहता ते काही वेगळा निर्णय घेणार का, याबाबत औत्सुक्य असेल. छगन भुजबळांच्या एकूणच राजकीय वाटचालीचा आढावा घेतला, तर त्यांचे राजकारण हे संघर्षांचेच राहिले आहे. ७० च्या दशकात शिवसेनेशी जोडल्या गेलेल्या भुजबळांनी सेनेचे शाखाप्रमुख, नगरसेवक, महापौर, आमदार अशी अनेक पदे भूषवली. या काळात सभागृह कसे गाजवायचे, हे भुजबळांनी दाखवून दिले. मात्र, १९९१ मध्ये सेनेला जय महाराष्ट्र करत भुजबळांनी काँग्रेसचा रस्ता धरला. या काळात शिवसेना आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा राज्याच्या राजकारणात मोठा दरारा होता. त्यामुळे त्यांना आव्हान देणे, हे धाडसाचे काम होते. मात्र, भुजबळांनी सेनेचे आमदार फोडून धाडसी निर्णय घेतला. त्या बदल्यात त्यांना सत्ता मिळाली, तरी १९९५ च्या निवडणुकीत शिवसेनेने भुजबळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना धूळ चारली.

भुजबळ आता राजकारणातून संपले, अशीच अटकळ तेव्हा बांधली गेली. मात्र, नंतरच्या टप्प्यात भुजबळांनी कमबॅक केले. नाशिककडे मोर्चा वळवत त्यांनी येवला मतदारसंघाची बांधणी केली आणि तेथून आमदार म्हणून सातत्याने ते निवडून आले. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून म्हणजे १९९९ पासून भुजबळ हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत होते. पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणूनही त्यांना काम करण्याची संधी दिली. असे असले, तरी मुख्यमंत्रिपद त्यांच्यापासून आणि एकूणच राष्ट्रवादीपासून दूर राहिले. भुजबळ सेनेत राहिले असते, तर कदाचित १९९५ मध्ये युतीचे सरकार आले, तेव्हा मुख्यमंत्री झाले असते, असे बोलले जाते. ती संधी त्यांच्याकडे नक्कीच होती, असे म्हणता येईल. अर्थात ती हुकली, तरी आपल्या राजकारणाचा अवकाश त्यांनी वाढवत नेला. अखिल भारतीय समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी समाजाची मोट बांधली. त्यामुळे ओबीसी समाजाचे नेते म्हणून भुजबळांकडे पाहिले जाते. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर भुजबळांनी अजितदादांना साथ दिली. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्याशीही वेळोवेळी पंगा घेतला. एवढी मोठी जोखीम पत्करल्यानंतरही त्यांना अजितदादांनी मंत्रिमंडळात न घेतल्यामुळे ओबीसी समाजात वेगळा संदेश जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वास्तविक, लोकसभा निवडणुकीत भुजबळांनी नाशकातून लढावे, याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आग्रही होते. मात्र, या जागेसाठी शिंदे गट अडून बसल्याने भुजबळांना माघार घ्यावी लागली. तसे भुजबळांचे अमित शहा, फडणवीस यांच्यासह भाजपच्या सर्वच नेत्यांसोबत चांगले संबंध आहेत. ओबीसी नेते म्हणून भुजबळ यांचे काय महत्त्व आहे, हे भाजपवाले जाणतात. या आघाडीवर भुजबळ आणि बीजेपी यांच्यामध्ये एक समान धागाही दिसतो. त्यामुळे उद्या भुजबळांनी नवी लढाई हाती घेतली, तर त्याला महाशक्तीकडूनही बळ मिळाले, तर आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. भुजबळांबरोबर भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार नाराज दिसतात. अर्थात पक्षाशी एकनिष्ठ असल्याने ते फार काही खळखळ करतील, असे नाही. मात्र, इतर पक्षातून आलेल्यांना कसा लाल गालिचा अंथरला जातो, हे त्यांनी ज्या स्पष्टपणे सांगितले, त्यातून त्यांची नाराजी अधोरेखित होते. तर फडणवीस यांचे निकटवर्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संजय कुटे यांनीही आपण कूटनीतीत कमी पडल्याचे सांगत नाराजी प्रकट केली आहे. शिंदे गटाचे तानाजी सावंत, नरेंद्र भोंडेकर, विजय शिवतारे यांनीही आपला असंतोष व्यक्त केला आहे. सावंत यांची कारकीर्द तशी वादग्रस्तच राहिली. निवडून येतानाही तशी त्यांची दमछाक झाली. त्यांनी मंत्रिपद न मिळाल्याने आदळआपट करणेही तसे स्वाभाविकच. भोंडेकर यांनी तर मंत्रिपद न मिळाल्याने आपल्या पक्षातील उपनेतेपदाचाच राजीनामा दिला आहे. मंत्रिमंडळ तयार करणे, हे कोणत्याही सरकारसाठी तसे कसरतीचेच काम असते. प्रत्येकालाच मंत्री व्हायचे असते. मात्र, एकाच वेळी प्रत्येकाचे समाधान करणे कठीणच. त्यात ज्येष्ठ मंत्र्यास डावलले, तर त्याचे वेगळे पडसाद उमटण्याची भीती असते. भुजबळ यांच्यासारख्या राजकारण्याचे महाराष्ट्रात वेगळे वलय आहे. ओबीसी समाजात त्यांची क्रेझ आहे. त्यामुळे त्यांना डावलण्याचे वेगळे परिणाम होऊ शकतात. विधानसभा निवडणुकीत भाजपाला १३२, शिंदे गटाला ५७, तर अजितदादा गटाला ४१ जागा मिळाल्या. या तिन्ही पक्षांची एकत्रित बेरीज २३० वर पोहोचल्याने सरकारला कोणताही धोका उद्भवण्याची शक्यता दिसत नाही. तथापि, कोणत्याही सरकारच्या स्थिरतेसाठी या सरकारमधील नेतेही स्वस्थ असणे महत्त्वाचे असते. भाजप आपल्या नेत्यांना नियंत्रणात ठेऊ शकतो. पण, दादा गट आणि शिंदे गटापुढे नक्कीच नाराजांचे आव्हान असेल.

# एसटीच्या ताफ्यात ३५०० बसेस येणार

## मुंबई-पुणे, नाशिक-संभाजीनगर मार्गावरील प्रवाशांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई-पुणे, नाशिक-संभाजीनगर, नागपूर-अमरावती मार्गावरील प्रवाशांची चिंता मिटणार आहे. एसटीच्या ताफ्यात ३५०० बसेस दाखल होण्याची शक्यता आहे. नवीन वर्षात ३ ते साडे तीन हजार नव्या एसटी बसेस आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी म्हटले आहे. तर, एसटी चालक हेडफोन लावून किंवा मद्यपान करुन गाडी चालवत असल्यास तात्काळ कारवाई करणार असल्याचेही गोगावले म्हणाले.**



दोन ते तीन वर्षांपूर्वी च्या ताफ्यात जवळपास १८,५०० बसेस होत्या. ज्यापैकी १५,५०० बसेस सेवा देत होत्या, दररोज ६५ लाख प्रवासी एसटी बसने प्रवास करत होते. मात्र, कोविडनंतर बसेस खराब होणे आणि नवीन बसेसची टंचाई यामुळे जवळपास १,००० बस कमी झाल्या. सध्या फक्त १४,५०० बसेस सेवा देत आहेत. त्यामुळे प्रवाशांची संख्या ६५ लाखांवरून ५४ लाखांपर्यंत घटली आहे.मागणी असूनही बसेसची टंचाई असल्याने महामंडळाला अनेक वर्षे तोट्याचा सामना करावा लागला. दोन वर्षांपूर्वी उचललेल्या उपाययोजनांनंतर ने आता आपल्या ताफ्यात भाडेतत्त्वावर १३०० नवीन बसेस सामील करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाअंतर्गत मुंबई-पुणे क्षेत्रासह नाशिक-संभाजीनगर आणि नागपूर-अमरावती यासारख्या प्रत्येक विभागासाठी सुमारे ४५० बसेस सेवेत समाविष्ट केल्या जातील. या नवीन बसेस नवीन वर्षापासून सेवेत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे ला आपला तोटा भरून नफा मिळवण्याची अपेक्षा आहे. फक्त एसटी महामंडळालाच नाही तर राज्यातील एसटी सेवांचा वापर करणाऱ्या गरीब जनतेलाही याचा फायदा होणार आहे. यामुळे प्रवास परवडणारा होईल आणि महागाईचा फटका कमी बसेल. म्हणूनच, महामंडळाकडून राज्याच्या कानाकोपऱ्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी हे नववर्षाचे खास गिफ्ट ठरणार आहे.

# अधिकार नसताना जिल्हा परिषदेत नियमबाह्य केल्या बदल्या; नियमानुसार कारवाईचे शासनाने काढले आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकारांना नियमबाह्य बदल्या केल्या असून सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान शासन आणि विभागीय आयुक्त आणि या संदर्भात तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**

या संदर्भात म्हटले आहे की, दि. २८ जुन २०२४ रोजी जिल्हा परिषदेतील सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनील नवले, जयलाल राजपुत, अनंत खेडकर, शिवाजी अदमुलवाड यांच्या आर्थिक लाभापोटो नियमबाह्य बदल्या करून आपल्या मर्जीतील संबंधित अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यात आले आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना प्रतिनियुक्ती व केव्हाही मनमानी बदलीचे अधिकार नसताना व विभागीय आयुक्त यांची पूर्व परवानगी न घेता जिल्हा परिषदेमध्ये सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी दिं. १० जुलै २०२४ रोजी प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार केली असता दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी नितीन पवार यांनी उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या संदर्भात पत्र देऊन नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेने यासंदर्भात सदरील नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या रद्द केलेल्या नाहीत अथवा कोणतीही कारवाई केली नाही. शासनाच्या नियमानुसार विभाग बदलीसाठी ५ वर्षे सेवेचा कार्यकाळ पूर्ण करावा लागतो. सर्वसाधारण बदल्यासाठी १० वर्षे सेवाजेष्ठता ग्राह्य धरण्यात येते. प्रशासकीय बदलीसाठी १० वर्षे सेवा आवश्यक आहे. विनंती बदलीसाठी ३ वर्षे सेवा आवश्यक आहे. या व्यतिरिक्त बदल्यांसाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. किंवा न्यायालयाच्या आदेशाने बदली करता येईल. यापैकी काहीही कारण नसताना आर्थिक लाभ घेऊन आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांना नियुक्त करुन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मनमानी कारभार केला आहे. ह्या नियमबाह्य पद्धतीने केलेल्या बदल्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड काय कारवाई करतात? याकडे दबक्या आवाजात चर्चा रंगत असुन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे लक्ष लागून आहे.

# सेवानंद महिला ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी विद्यालयाला ड्युअल डेस्क भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील सेवानंद महिला ग्रुप व प्रा. संगीता जाधव यांच्या संयुक्त विद्यमाने कै. निळकंठ जाधव यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त छत्रपती शिवाजी विद्यालयाला ३० ड्युअल डेस्क देण्यात आले.**



या निमित्त छत्रपती शिवाजी विद्यालयात मंगळवारी (दि.१७) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उज्वला होके पाटील या होत्या. यावेळी अंजली सोळंके, प्रा. स्नेहल पाठक, शोभा वर्मा, प्रा. संगीता जाधव, जान्हवी जाधव, सुनीता शेजुळ, जयश्री लड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. निळकंठ जाधव यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री लड्डा यांनी केले. यामध्ये त्यांनी सेवानंद महिला ग्रुपच्या वतीने आत्तापर्यंत विविध शाळांना दिलेल्या मदतीची माहिती दिली व कै. निळकंठ जाधव यांच्या आठवणींना उजाळा दिला . यावेळी प्रा. स्नेहल पाठक यांनी सांगितले की, मुख्याध्यापक निळकंठ जाधव हे उपक्रमशील मुख्याध्यापक होते.आयोजकता, कल्पकता हे त्यांचे गुण होते. प्रा. संगीता जाधव यांनी कै. निळकंठ जाधव यांच्या अकाली निधनाने आमच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याचे सांगितले. मुख्याध्यापक कै. निळकंठ जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ १० वी वर्गातून प्रथम येणार्या विद्यार्थ्याला बक्षीस जाहीर केले. अध्यक्षीय समारोप उज्वला होके पाटील यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर पारगावकर, आप्पासाहेब होके, मुरलीधर भाळशंकर, माधव घोलप, सय्यद गयास, दत्तात्रय इंगळे, मिलिंद देशपांडे, अनंत राठोड, सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, पंकज कळसकर, तुळशीराम साळवे, शेख शहानूर , ज्ञानेश्वर पवार, दत्तात्रय पांडे, दिनकर काळे यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# परळी तालुक्यामध्ये पीक विमा प्रकरणी २२ कोटी रुपयांचा घोटाळा?

## आ.सुरेश धस यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तक्रार

**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये विशेषत: परळी तालुक्यामध्ये शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या पीक विमा प्रकरणात अनेक सी.एस.सी. सेंटर चालक आणि काही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी मालकी हक्कातील शेतकऱ्यां ऐवजी पीक विमा रक्कम भरलेली असल्याचे दिसून येत आहे या पीक विमा प्रकरणांमध्ये किमान २२ कोटी रुपयाचा आर्थिक घोटाळा झाला असावा त्यामुळे या प्रकरणाची सखल चौकशी करण्यात यावी आणि शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी आ.सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र शासनाद्वारे शेतकऱ्यांच्या हिताचा असलेला पीक विमा केवळ एक रुपयांमध्ये भरता येईल अशी ऐतिहासिक योजना अंमलात आणली आणि ही योजना लोकप्रिय झाली मात्र त्याचा गैरफायदा काही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी घेऊन आणि सी.एस.सी. केंद्र चालकांना हाताशी धरून मूळ शेतकऱ्यांच्या नावे जमिनीची मालकी आणि सात/ बारावर उताऱ्यावर नोंदी असून देखील त्यांच्या ऐवजी मालक नसलेल्या कार्यकर्त्यांच्या नावे विमा भरलेला असून त्यांनी विमा रक्कम देखील उचललेली असावी .. याबाबत अनेक शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केलेली असूनही त्याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले असल्यामुळे काही शेतकऱ्यांनी याबाबत आ.सुरेश धस यांच्याशी नागपूर येथे जाऊन संपर्क साधला. आणि त्यांना त्यांच्यावर झालेल्या अन्याया बाबतची माहिती दिल्यानंतर आ.सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची समक्ष भेट घेऊन याबाबत चौकशीची मागणी केली आहे. यावेळी आ.सुरेश धस यांनी प्रतिक्रिया देऊन ,ही अत्यंत दुर्दैवी बाब असून ,केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात प्रत्येक पीकनिहाय वेगळे वेगळे पिकांचे रक्कम घेऊन विमा कंपन्या विमा उतरवत होत्या मात्र ही रक्कम शेतकऱ्यांना परवडणारी नसल्यामुळे शेतकऱ्यांचे या योजनेकडे दुर्लक्ष होऊन त्यामध्ये शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे लक्षात घेऊन राज्य सरकारने केवळ एक रुपयात पिक विमा ही योजना शेतकऱ्यांसाठी आणली व लोकप्रिय झाली मात्र त्याचा गैरवापर काही पक्षाचे कार्यकर्ते करताना दिसून येत आहेत त्यामुळे याची सखोल चौकशी करून याच्या आरोपीवर गुन्हा दाखल झाला पाहिजे व आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे केली आहे. या प्रकरणाची गांभीर्य लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे काय भूमिका घेतात याची बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उत्सुकता आहे.

# पान १ वरून...

### हमीभावापेक्षा कमी दराने

की गॅरंटी म्हणून जाहीर करण्यात आलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीनला ४८९२ रुपये प्रति क्विंटल भाव देण्याचे जाहीर करण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र या कोणत्याही आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष खदखदतो आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने याबाबत हस्तक्षेप करून दिलेला शब्द पाळावा व किमान ६००० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे १५ टक्के मॉइश्चर असलेले सोयाबीन खरेदी करणारी केंद्रे प्रत्येक बाजार समितीत सुरू करावीत अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.

----------

### भाजपसोबत जा, भुजबळ

शून्यातून लढा देऊन निर्माण करणारे लोक आहोत. त्यामुळे आपण पुन्हा लढू, हा लढा हा मंत्रीपदाचा नाही तर अस्मितेचा आहे, अशा भावना व्यक्त केल्या असल्याची माहिती छगन भुजबळ यांनी दिली आहे. आपण अनेक मंत्रीपदावर काम केले आहे. गेल्या ४० वर्षांहून अधिक काळापासून आपण काम करतो आहोत. त्यामुळे हा प्रश्न मंत्रीपदाचा नाही. आपला हा लढा अस्मितेचा लढा आहे. त्यामुळे सर्वांनी एकसंध राहून काम करावे. मतदारसंघातील जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय कुठलाही निर्णय आपण घेणार नाही असे ग्वाही दिली, असे छगन भुजबळांनी सांगितले आहे.

----------

### सरपंच देशमुख कुटुंबियांसाठी

संतोष देशमुख यांना आगळ्यावेगळ्या पद्धतीने आदरांजली अर्पण करण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातून सर्वपक्षीय मदत फेरी काढण्यात आली होती. या मदत फेरीतून एकविस लाख रुपयांची मदत जमा झाली असुन दुपारपर्यंत मदतीचा ओघ सुरूच आहे. या मदत करीत बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, अँड. बी आर डक, डॉ. वसीम मनसबदार, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, संभाजी शेजुळ,मनोहर डाके, राकेश साळवे, हनुमान कदम, राम डोईजड, अविनाश जावळे, रेखा आंबुरे, मनोज जगताप, नितीन मुंदडा, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संजय रेदासणी, निळकंठ भोसले, नवाब पटेल, खलील पटेल, विजय शिंदे, ज्ञानेश्वर मेंडके यांचे सह सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**या दानशूर व्यक्तींनी केली मदत**

आ. प्रकाश सोळंके १० लाख, सभापती अशोक डक ५१ हजार, भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत २५०००, शिवाजी रांजवन २५०००, खलील पटेल २१००० दीपक मेंडके २१०००, माधव शेंडगे ११०००, कल्याण आबुज ११०००, डॉ अशोक तिडके ५०००, ज्ञानेश्वर सरवदे पाच हजार, विलास साळवे ५०००, साहेबराव सोळंके ५०००, विलास गायकवाड पाच हजार, कृष्णा कुरे ५०००, तुकाराम येवले ५०००, रुख्मानंद शेंडगे ५०००, ओंकार ज्वेलर्स ५०००, रामराजे रांजवण ५०००, शरद भांडेकर,मुक्तीराम आबुज, सिंधू शेंडगे, साई ट्रेडर्स, गौतम ऋषी, सचिन शेजुळ, महेश कदम, नारायण भले, प्रसाद सावंत, देवानंद शिंदे, शेख जमीर, अशोक नरवडे यांचे सह समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी सढळ हाताने मदत केल्याने एकवीस लाख रुपयांची मदत जमा झाली होती.

------------

### अजितदादांच्या मंत्र्यांना

आहे. धनंजय मुंडे, अदिती तटकरे यांच्यासह इतर मंत्र्यांना महत्वाचे खाते मिळणार आहेत. देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचे खाते वाटप दोन दिवसात होणार असल्याचे सांगितले जात आहे. मंत्रीही आपल्याला कोणते खाते मिळणार याकडे लक्ष लागले आहे. तर शिवसेना आणि राष्ट्रवादीलाही आपल्याला कोणती खाती मिळणार याची उत्सुकता लागली आहे. शिवसेनेने गृहखात्यासाठी बराच आटापिटा केला. पण त्यांच्या पदरी निराशा आली. तर अजितदादा यांच्या राष्ट्रवादीकडचे अर्थ खाते फडणवीस स्वत:कडे ठेवणार असल्याची चर्चा होती. त्यामुळे अजितदादांकडे अर्थ खातं राहणार की नाही असे बोलले जात होते. पण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अर्थ खातं अजितदादांकडेच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अजितदादांच्या राष्ट्रवादीकडे जुनीच खाती येणार आहेत. त्यांना एकच नवे खाते दिले जाणार आहे. मात्र खात्यात अदलाबदलीही होणार नसल्याचे सांगण्यात आले. अर्थ आणि नियोजन, महिला आणि बालकल्याण, कृषी, सहकार, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा आणि बंदरे, मदत पुनर्वसन, अन्न नगरी पुरवठा आणि अन्न औषध प्रशासन ही खाती राष्ट्रवादीच्या वाट्याला येण्याची शक्यता आहे. त्यात राज्य उत्पादन शुल्क हे खाते नव्याने राष्ट्रवादीला मिळणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे नव्या सरकारच्या खाते वाटपाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

----------------------

### बीडचे राजकारण तापणार; शरद

बजरंग सोनवणे यांनी संसदेत या खून प्रकरणावरून सरकारवर निशाणा साधला. तर इकडे नागपूरमध्ये संदीप क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला. बीड जिल्ह्यातील बडे नेते आरोपींना वाचवण्याचा आणि पाठीशी घालत असल्याचा आरोप केला. वाल्मिक कराड हा मुंडे यांचा सहकारी असल्याचा उल्लेख क्षीरसागर यांनी केला. वाल्मिक कराड यांच्यामुळे बीड जिल्ह्यात दहशत, अशांतता असल्याचा दावा क्षीरसागर यांनी सभागृहात केला. संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे लोकांच्या मनात भीती आणि चीड असल्याचे ते म्हणाले. या प्रकरणातील सर्वच आरोपींना आणि कराड यांना अटक केल्यास बीडमधील वातावरण शांत होईल असे ते म्हणाले.

-----------

### गेटवे ऑफ इंडिया दुर्घटनेत

आहे. गेट वे ऑफ इंडिया जवळच्या समुद्रात ही दुर्घटना घडली आहे. मुंबईत गेट वे ऑफ इंडियाच्या समुद्राजवळ प्रवासी बोट बुडालीय. नीलकमल नावाची ही बोट गेट वे वरुन एलिफंटाला निघाली होती. त्याचवेळी एका नेव्हीच्या स्पीडबोटने धडक दिली. या धडकेमुळे बोट बुडाली. दुपारी सव्वातीनच्या सुमारास ही घटना घडली. दुर्घटना घडल्यानंतर घटनास्थळी नेव्हीच्या बचावनौका दाखल झाल्या. ११० प्रवाशांना बाहेर काढण्यात आल्याची माहिती आहे. १०४ जणांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. पण दुर्घटनाग्रस्त बोटीतील ४ जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. दुर्घटनेत १३ जण मृत्यू झाल्याची माहिती आहे. मृतांचा आकडाही वाढण्याची शक्यता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वर्तवली आहे.

-------------

### शरद पवार शांत, याचा अर्थ

यासंदर्भात माध्यमांच्या प्रतिनिधींनी संजय शिरसाट यांना सवाल केला. यावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, 'तो त्यांचा आपापसातला मामला आहे. आता महाविकास आघाडी राहिली कुठे? महाविकास आघाडीने एकमेकांना पाडण्याचे जे काम केले आहे. त्याचा परिणाम आताच्या विधानसभा निवडणुकीत जनतेला दिसून आलाय. आता उद्धव ठाकरे ना नाना पटोले यांना भेटणार ना महाविकास आघाडीतील कोणी कोणाला भेटणार? अशातच हिवाळी अधिवेशनात किंवा अधिवेशानानंतर शरद पवार काय निर्णय घेतील हे तेव्हाच कळेल' असं म्हणत संजय शिरसाट यांनी मविआवर निशाणा साधला पुढे ते असेही म्हणाले, शरद पवार आहेत ते.. सुप्रिया सुळे कुठे बोलताना दिसतात? त्यांचे कोणते तरी प्रवक्ते बोलताना दिसतात याचा अर्थ समजून घ्या जेव्हा पवार शांत असतात याचा अर्थ वादळ निर्णय होत आहे, असे संजय शिरसाट यांनी म्हटले असून सूचक वक्तव्य केले आहे.

---------

### बीड मतदारसंघातील आ.क्षीरसागरांनी

असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मांडले. बीड शहरातील अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न, खांडेपारगाव येथील टुकूर साठवण तलाव प्रश्न आणि शहरातील बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल बांधणी करणे हे महत्वाचे विषय मार्गी लावण्याबाबतची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात औचित्याच्या मुद्यांद्वारे केली.

------------

cmyk

## शेतात एकटीला पाहून तुटून पडला, नराधम पकडला

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील तूकुचीवाडी येथे शेतात गवत कापण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

या बाबतची माहिती अशी की, मंगळवारी (दि.१७) दुपारी केज तालुक्यातील तूकुचीवाडी येथे २३ वर्षीय महिला ही घरपासून जवळ असलेल्या शेतात गवत कापण्यासाठी गेली होती. शेतात कोणी नसल्याचा गैरफायदा घेऊन कल्याण आश्रुबा चौरे या नराधमाने तिच्या पाठीमागून जात शेतात कोणी नसल्याचा गैरफायदा घेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

दरम्यान पीडीतेच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलिसांनी आरोपी कल्याण आश्रुबा चौरे याला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला २० डिसेंबर पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि.१९ डिसेंबर २०२४




# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव

**नागपूर । प्रतिनिधी**

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.





ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा-या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धर्मेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

## अल्पसंख्याकांच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेऊन प्रगती साधावी -रिता मैत्रेवार

जालना । प्रतिनिधी

भारत देश विविधतेने नटलेला आहे. देशातील विविध जाती, धर्म, पंथाच्या नागरिकांना भारतीय संविधानाने एकसंघ ठेवले आहे. केंद्रासह राज्य शासनाने अल्पसंख्याकांच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. अल्पसंख्याक समुदायाच्या जीवनात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी शासनाच्या विविध योजनेचा उपयोग होत आहे. अल्पसंख्याकांच्या विकासासाठी केंद्रासह राज्य शासनाच्या विविध योजना सुरु असून या योजनांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अल्पसंख्याक हक्क दिनाचे आयोजन बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा



अल्पसंख्याक अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांच्यासह अल्पसंख्याक समुदायातील विविध संघटना, संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रा. चिंचखेडकर म्हणाले की, अल्पसंख्याक समुदायातील महिलांनी सक्षम होणे गरजेचे असल्याने शासनाकडून अल्पसंख्याक समुदायाच्या महिलांसाठी विविध योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. असे सांगून त्यांनी अल्पसंख्याक समुदायासाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्रासह राज्य शासनाच्या विविध योजनांवर प्रकाशही टाकला. अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार म्हणाल्या की, अल्पसंख्याक समुदायातील घटकांना पुढे आणण्यासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी देशात १८ डिसेंबर 'अल्पसंख्याक हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. शासनाच्या अल्पसंख्याकांच्या विकासासाठी अनेक योजना आहेत. याचा लाभ घेवून अल्पसंख्याकांनी आपली प्रगती साधावी, असे सांगून अल्पसंख्याक समुदायाच्या प्रतिनिधीच्या समस्या जाणून घेत त्यांना समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमास संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची व अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींची उपस्थिती होती

## इस्कॉन तर्फे कैद्यांचे प्रबोधन आणि श्रीमद्भगवद्गीता वाटप

जालना । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ संचलित इस्कॉन जालना युवा कल्याण केंद्राच्या वतीने गीता जयंती उत्सवाचे औचित्य साधून कैदी सुधार उपक्रमांतर्गत बुधवारी ( ता. १८) शहरातील कारागृहात कैद्यांचे प्रबोधन करून श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाचे वाटप करण्यात आले.

इस्कॉन जालना युवा कल्याण केंद्राच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष उद्योजक घनश्यामदास गोयल, केंद्र प्रमुख रास गोविंद दास प्रभु, करागृहाचे अधीक्षक कैलास काळे, वरिष्ठ जेलर प्रवीण विभांडीक, जेलर राजाराम उन्हाळे ,मिश्रक इंगोले ,सुभेदार अहिरराव,विनोद कुमावत, कन्हैया खेरूडकर, डॉ. विवेक केंद्रे, यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. केंद्र प्रमुख रास गोविंद दास प्रभु यांनी मानवाचे मन हाच खरा मित्र आणि सर्वात मोठा शत्रू आहे.मनावर विजय प्राप्त करावा असे नमूद करत प्रत्येक परिस्थिती, घटना, ही तात्पुरती आणि बदलणारी असते या वर सविस्तर मार्गदर्शन करतांना श्रीमद्? भगवद्गीतेच्या वाचनातून धार्मिक,नैतिक मूल्ये अंगीकारावी असे रास गोविंद दास प्रभु यांनी सांगितले. यावेळी उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते १०० कैद्यांना श्रीमद्? भगवद्गीता ग्रंथाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास १५० कैद्यांची उपस्थिती होती. कारागृह प्रशासनाने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

पान ६ वरून...

### मंझरी (घाट) जलजीवन

असुन आज दुपारपर्यंत कोणत्याही आधिका-याने उपोषणाला भेट दिली नाही. यावेळी आंदोलनात प्रकाश नांदे, बाजीराव गिते, आकाश नांदे, पोपट शिंदे, प्रल्हाद भांबे,संदिप गिते, ईश्वर नांदे, महादेव भांबे, प्रकाश गिते,संजय गिते संगीत नांदे, श्रीराम नांदे, महादेव नांदे, लक्ष्मण नांदे आदी ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

### अमित शहा यांनी तमाम

समुदायाच्या वतीने सर्वपक्षीय आंदोलन उभे करू व त्यातून होणाऱ्या परिणामास केंद्रीय मंत्री अमित शहा यांना सामोरे जावे लागेल, असा इशारा देत जिल्हा काँग्रेस अनु. जाती विभागाचे नेते तथा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे भाजपा व अमित शहा यांनी आंबेडकरी समुदायाची माफी मागावी, असा जाहीर निषेध व्यक्त करत इशारा दिला आहे.

### बाळराजे पवारांच्या वाढदिवसा

आरोग्य शिबीर घेण्यात येणार आहे तरी सर्व जनतेने दि.२१ डिसेंबर शनिवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल येथे आरोग्य शिबीरात सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करुन घ्यावी तसेच यांच ठिकाणी रक्तदान शिबीर सुध्दा घेण्यात येणार आहे तरी रक्तदान करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी,ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे,मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्मपाल सौदरमल, बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के,जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे,भरत गायकवाड,जुनेद बागवान, इम्रान पठाण यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

मतदार संघातील लोकनेते बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर, रुग्णालयात रुग्णाना फळे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप, गरजु लोकांना बिलॅकट,रक्तदान शिबीर आयोजन करुन बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी

### डिघोळअंबा येथे रस्ता रोको

४) परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी या भिमसैनिकाचा पोलिसांच्या पि.सी.आर. मधील मारहाणीत मृत्यु झाल्यामुळे एस.आय.टी. चौकशी नेमून दोषी पोलिसांच्या विरोधात ३०२ कलमानुसार गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात यावी., ५) मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटूंबातील व्यक्तींना शासकीय सेवेत रूजु करण्यात यावे व त्यांच्या कुटुबाला आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे या मागण्यांचा समावेश आहे. डिघोळअंबा (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील रास्ता रोको आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते अक्षय भुंबे, उपसरपंच बालाजी मुळे, ग्रामपंचायत सदस्य मिलिंद खरात, नानासाहेब मुळे, शेख रहीम, अमोल सावंत, नुर शेख, सचिन गुंडरे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी व युवकांसह डिघोळअंबा येथील असंख्य गांवकरी सहभागी झाले होते.

बीड जिल्हा दहशतमुक्त करा, दलितांवरील अन्याय अत्याचार थांबवा :

मस्साजोग (ता.केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून टॉर्चर करून निघृण खून करण्यात आली. या अपहरण प्रकरणात केज पोलिस स्टेशनचे पी.आय. महाजन, पि.एस.आय.पाटील यांनी राजकिय पुढाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे जाणिवपूर्वक दिरंगाई केल्यामुळे देशमुख यांचा निघृण खून करण्यात आला. सदरील प्रकरणात सत्ताधारी पक्षाच्या लोकांचा सहभाग असल्यामुळे बीड पोलिस राजकिय दबावापोटी मयत देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करून निष्पक्ष कारवाई करत नसल्यामुळे या प्रकरणाचा खरा मास्टरमाईंड गजाआड होणे गरजेचे असल्यामुळे मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात एसआयटी नेमून ॲडीशनल एसपी यांची आयओपदी नेमणूक करून सदरचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून सर्व दोषी आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी. तसेच परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी या भिमसैनिकाचा पोलिसांच्या पि.सी.आर. मधील मारहाणीत मृत्यु झाल्यामुळे एस.आय.टी. चौकशी नेमून दोषी पोलिसांच्या विरोधात ३०२ कलमानुसार गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात यावी. माणुसकी जोपासा, अपप्रवृत्ती, दादागिरी यांना सत्ताधारी नेत्यांनी पाठबळ देवू नये. बीड जिल्हा दहशतमुक्त करा तसेच जिल्ह्यासह राज्यातील दलित बांधवांवर होणारे अन्याय अत्याचार तात्काळ थांबवा. अन्यथा जनतेच्या आक्रोशाचा सामना करावा लागेल.- अक्षय भुंबे (सामाजिक कार्यकर्ते)

### खोलेश्वर महाविद्यालयाच्या

सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांची उपस्थिती होती. तर व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. कल्पनाताई चौसाळकर, आप्पाराव यादव , वर्षाताई मुंडे तसेच खोलेश्वर शैक्षणिक संकुल ,अंबाजोगाईच्या स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर, खोलेश्वर जीनियस सीबीएससी स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती . या कार्यक्रमात स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर व केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. कल्पनाताई चौसाळकर यांनी डॉ.पोहेकर यांना आपल्या मनोगताद्वारे शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. प्रीती पोहेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. मनोगताद्वारे त्यांनी महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन यावेळी दिले.कार्यक्रमाचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. प्रीती पोहेकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन आपण आपल्या ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा उपयोग महाविद्यालयास वैभवशाली बनविण्यासाठी कराल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी यांनीही डॉ. पोहेकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### भगवान दत्तात्रय हे जीवनासाठी

यांनी या पवित्र स्थळाला ''प्रतिकाशी'' असे संबोधले व या धार्मिक क्षेत्राला एक विशेष अध्यात्मिक महत्त्व दिले आहे.

भगवान दत्तात्रयांच्या जन्मोत्वाच्या निमित्ताने आयोजित महोत्सवात महापूजा, प्रवचन व भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित लावून या कार्यक्रमाचा लाभ घेतला. श्री क्षेत्र दत्तधाम हे आध्यात्मिक उन्नतीचे केंद्र ठरत असून, श्रद्धा व भक्तीने संपूर्ण परिसराला नवचैतन्य प्राप्त झाले आहे.

## गर्भलिंग निदान करण्यासाठी आलेली अवैध सोनोग्राफी मशीन पकडली

जालना । प्रतिनिधी

१८ डिसेंबर रोजी जालना शहरामध्ये गर्भलिंग निदान करणेकामी वापरण्यात येणारी अवैध सोनोग्राफी मशिन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय चे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांना मिळाल्याने त्यांनी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणो यांना सांगितल्याने पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखाचे एक पथक स्थापन करुन जिल्हा शल्य चिकित्सक पांचेसोबत कारवाई करण्यासाठी पथक तत्काळ पाठविण्यात आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी संयुक्तरित्या गर्भलिंग निदान करणेकामी वापरण्यात येणारी अवैध सोनोग्राफी मशिन विक्रीसाठी आलेला आरोपी संदीप कैलास गोरे, वय-२३ वर्ष, रा. भिलपुरी, ता.जि.जालना ह.मु. महेको कंपनी फार्महाऊस, राजुर रोड, ता.जि. जालना, २) सोमनाथ परसराम बारसे, वय-३० वर्ष, रा.हनुमान नगर, कमलापुर, वाळुन, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ३) योगेश शालीकराव धांडे, वय २२ वर्ष, रा. चाळगेनगर, इंदेवाडी, ता.जि. जालना यांना सापळा लावुन अंबड चौफुली मंठा रोड इथे कारवाई करण्यात आली



व सदरील आरोपी यांच्या ताब्यातुन एक रु.५,००,०००/- किमतीची गर्भलिंग निदान करणारी सोनोग्राफी मशिन, एक स्विफ्ट डिझायर कार, एक टिव्हीएस ज्युपीटर स्कुटी असा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने तालुका पोलीस ठाणे, जालना येथे कायदयांतर्गत गुन्हा दाखल करणे चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी , श्री पंकज जाधव पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, डॉ. बेबी सरोज घोलप, जिल्हा नोडल अधिकारी जालना, ॲड सोनाली कांबळे विधी सल्लागार जालना, डॉ. प्रज्ञा कुलकर्णी स्त्री रोग तज्ञ, डॉ. ज्ञानेश्वर वायाळ, क्ष किरण तज्ञ, शेख वसीम शेख हनीफ सांख्यिकी सहायक सर्व जिल्हा सामान्य रुग्णालय व स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि.श्री.योगेश उबाळे, पोउपनि, राजेंद्र वाघ, पोलीस अमंलदार सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पव्हरे, प्रशांत लोखंडे, सुधीर वाघमारे, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, इर्शाद पटेल, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर, योगेश सहाणे, कविता काकस, सत्यभामा काकडे, सौरभ मुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा यांनी केलेली आहे.


### जाहीरनामा

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि. बीड
(दंड-विभाग) दूरध्वनी - (०२४४१)२८२५४२
क्र.२०२४/दंड/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि/२०७५
Email-id:tehsildarashti@gmail.com दि.१२/१२/२०२४
जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.
जन्म आणि मृत्यूची नोंदणीरे सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११०) अन्वये

सर्व जनतेश मौजे जामगाव ता. आष्टी यांना जाहीर केले जाते कि अर्जदार श्री. ज्ञानदेव नामदेव रणसिंग रा. जामगाव ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचा मुलगी नामे आयेशा ज्ञानदेव रणसिंग हिचा जन्म दि. १०/१०/२०१० रोजी मौजे जामगाव ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदाराला सदरहू जन्मची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे मुलीचे कायदेशीर जन्मचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समाजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावर असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोद कायदेशीर असल्याबबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १२/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब**
**तहसिलदार, आष्टी**

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड जि. जालना, कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा.क्र.२०२४ /सेतु /कावि-१४५५ दिनांक: २१/१०/२०२४
Email-id-tehsildarambad@gmail.com
अर्जदार- मंगलबाई बाबुराव सानप रा. वठाण खु.
विरुध्द
ग्रामपंचायत कार्यालय नगर परिषद वठाण खु. ता.अंबड
विषय- कलम १३(३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी / ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटण करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नामे मंगलबाई बाबुराव सानप रा. वठाण खु. ता. अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार यांनी त्यांच्या पती नामे माझे बाबुराव गणपत सानप यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यू दि. ०३/०२/२०१२ रोजी वठाण खु असल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, जन्म/मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २१/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७९९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २८/११/२०२२

### नाव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री./सौ. श्रीमती: आबासाहेब नामदेव सरोदे, २. रेखा आबासाहेब सरोदे

प्रकरण सर्वे नं ३७/२ मधील प्लॉट नं ९३ न.प. मि. नं १८-६३-९३/१ हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमता घर क्र. (९३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा
पूर्व :- विजय विठोबा ससाणे यांची जागा
पश्चिम :- भाऊ सुज्ञान निर्मळ या यांचा प्लॉट नं ९२ मधीस भाग
दक्षिण :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता.
उत्तर प्लॉट नंबर ९६ व ९७

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबड**

### जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६६/२०२४
रामचंद्र दामोधर गिरे -विरुध्द ग्रा.पं. लिंबागनेश
पहा
१. रामचंद्र दामोधर गिरे,रा. लिंबागणेश ताजि-बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत जनाबाई दामोधर भिरे यांचा दिनांक २/१०/२०१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास लिंबागणेश ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लिबागणेश ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २७/०१/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार बीड**


cmyk

# हाडं गोठवणारी थंडी पडणार, महाराष्ट्रातील 'या' भागात थंडीची लाट

राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं कडाक्याची थंडी जाणवत आहे, तर कुठं ढगाळ वातावरअ असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज आणि उद्या म्हणजे १५ व १६ डिसेंबर ला संपूर्ण महाराष्ट्रात थंडीची लाट येणारक आहे. राज्यात हाडं गोठवणारी थंडी पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

'या' भागात थंडीची लाट

माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे ५ चे किमान तापमानं हे बऱ्याच ठिकाणी एक अंकी संख्येवर आले आहे, ही तापमाने सरासरीपेक्षा २ ते ६ डिग्रीपर्यंत खालावून जळगांव अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर बुलढाणा धाराशिव परभणी नांदेड अकोला अमरावती चंद्रपूर नागपूर वर्धा या सर्व जिल्ह्यात या दोन दिवसात थंडीची लाट व काही जिल्ह्यात थंडीची लाटसदृश्य स्थितीची शक्यता जाणवत असल्याची माहिती खुळे यांनी दिली आहे. सध्या जाणवत असलेली अपेक्षीत थंडी बुधवार दिनांक १८ डिसेंबर (संकष्टी चतुर्थी) पर्यंत टिकून राहण्याची शक्यताही कायम आहे.



खान्देशातील नंदुरबार धुळे जळगांव अश्या तीन जिल्ह्यात काही ठिकाणी सरासरी असलेल्या साधारण दवांक बिंदू तापमान व वाढलेल्या आर्द्रतेमुळे अति खालावलेल्या किमान तापमानातून, भू-स्फटिकीकरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

राज्यातील पावसाचं वातावरण निवळलं

पुढील काही दिवसातील पहाटे ५ चे किमान व दुपारी ३ चे कमाल अशी दोन्हीही तापमाने घसरून, सरासरी इतकी म्हणजे, भागपरत्वे किमान १० ते १२ तर कमाल २८ ते ३० डिग्री से. ग्रेड दरम्यान राहण्याची शक्यता जाणवते. दरम्यान, सध्या राज्यातील सर्वच ठिकाणी वातावरण बदल होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मागच्या दोन तीन दिवसापूर्वी राज्यातील काही भागात पावासनं देखील हजेरी लावल्याचं पाहायला मिळालं होतं. यामुळं शेतकरी चांगलेच धास्तावले होते. कारण हा पाऊस फळपिकांसाठी धोकादायक असतो. त्यामुळं द्राक्ष, डाळिंब केळी उत्पादक शेतकरी चिंतेत होते. मात्र, सध्या राज्यातील पावसाचं वातावरण निवळलं आहे. पुन्हा एकदा राज्यात थंडीचा जोर वाढण्याची शक्यता

हवामान अभ्यासकांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढचे काही दिवस थंडीचे आहेत. शेतकऱ्यांनी, रब्बी पिकांचे सिंचन, तणनियंत्रण व खत नियोजन यांचा मेळ घालून पीक वाढीचा वेग-दर साधावा. या दिवसाच्या थंडीचा लाभ उठवावा, असे खुळे म्हणाले. कारण डिसेंबरातील थंडीच्या मासिक अंदाजनुसार, शेवटच्या आठवड्यात कमाल व किमान अशी दोन्हीही तापमाने, सरासरीपेक्षा अधिक राहून, थंडी सरासरीपेक्षा कमी जाणवण्याची शक्यता आहे.



## लवंगाची शेती आहे फायदेशीर

लवंगाची शेती, जी मुख्यतः पूजेत वापरली जाते, शेतकऱ्यांसाठी फायदेशीर व्यवहार ठरू शकते. देशभरात याला खूप मागणी आहे, पूजेबरोबरच त्याचा खाण्यातही उपयोग होतो. देशात लवंगांना खूप मागणी आहे. याशिवाय त्याची विक्रीही उत्तम दराने होते.

हिवाळ्यात लवंग खाल्ल्याने सर्दी, सर्दी, डोकेदुखी यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो. त्याचबरोबर लवंगीपासून बनवलेली टूथपेस्ट आता बाजारात आली आहे. लवंगापासून अनेक प्रकारची आयुर्वेदिक औषधे बनवली जातात. याशिवाय लवंगापासून सौंदर्य उत्पादनेही बनवली जात आहेत. लवंग उष्ण हवामान असलेल्या भागात घेतले जाते. बकव्हीट झाडे ३० ते ३५ अंश तापमानात वेगाने वाढतात. म्हणूनच महाराष्ट्रातील कोकण भागात ते जास्त घेतले जाते. लवंगाचे रोप लावायचे असेल तर त्याच्या बिया एक दिवस आधी पाण्यात भिजवाव्यात. नंतर बियांच्या वरची साल काढून बिया पेरल्या जातात. पेरणीचे अंतर १० सें.मी. यासोबतच शेतात नेहमी सेंद्रिय खतांचाच वापर करावा. भारतात अनेक शतकांपासून मसाल्यांची लागवड सुरू आहे. इथल्या मसाल्यांची चव सगळ्या जगाच्या जिभेवर चढली आहे. यामुळेच आज भारत मसाल्यांचा मोठा निर्यातदार बनला आहे. भारतीय मसाल्यांना इतर देशांमध्ये मोठी मागणी आहे. यामुळेच मसाले उत्पादक शेतकरी प्रत्येक संभाव्य युक्ती वापरून चांगल्या दर्जाच्या मसाल्यांची लागवड करतात. यातील अनेक मसाले असे देखील आहेत की, पेरणी आणि लावणी एकदाच केल्यावर त्यांचा अनेक दशके शेतकऱ्यांना फायदा होतो. यामध्ये लवंगांचा समावेश आहे, ज्याचा वापर मसाले आणि औषधे म्हणून केला जातो. भारतातील कोकणात लवंगाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. याचा उपयोग आयुर्वेदिक औषध बनवण्यासाठी तसेच लवंग पेनकिलर आणि लवंग पेनकिलर औषधे बनवण्यासाठी केला जातो. पाच वर्षांनी लवंगाची फळे रोपावर येऊ लागतात. लवंग द्राक्षांप्रमाणे गुच्छांमध्ये वाढतात. त्याचा रंग लाल आणि गुलाबी आहे.

## ब्रोकोली लागवड: एक फायद्याची शेती

ब्रोकोली ही एक लोकप्रिय आणि पौष्टिक भाजी आहे जी भारतात वाढत्या प्रमाणात लागवड केली जात आहे. ब्रोकोलीची लागवड हा एक फायद्याचा व्यवसाय असू शकतो, परंतु त्यासाठी योग्य ज्ञान आणि तंत्रांची आवश्यकता आहे.

हवामान आणि जमीन : ब्रोकली थंड हवामानात चांगली वाढ करते. त्याची लागवड १० ते २५ अंश सेल्सिअस तापमानात करावी लागते. ब्रोकोलीची लागवड कोणत्याही प्रकारच्या जमिनीत करता येते, परंतु मध्यम जमीन चांगली असते. जमिनीचा ५.५ ते ६.५ च्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

रोपे तयार करणे : ब्रोकलीची रोपे नर्सरीमध्ये तयार केली जातात. रोपे तयार करण्यासाठी, ब्रोकलीच्या बियाण्याची पेरणी २०० ते ३०० चौरस मीटर आकाराच्या नर्सरीमध्ये करावी. रोपे तयार होण्यासाठी ४ ते ६ आठवडे लागतात.

लागवड

ब्रोकलीची रोपे ३० ते ४५ सेंटीमीटर अंतराने लावली जातात. रोपे लावल्यानंतर, त्यांना पाणी द्यावे लागते. रोपे लावल्यानंतर साधारणपणे २ ते ३ पाण्याचे फेरा द्यावे लागतात. ब्रोकोलीच्या झाडा वाढत असताना, त्यांना खताची गरज असते. ब्रोकोलीची लागवड केल्यानंतर २ महिन्यांत त्याची कापणी करता येते.

कापणी आणि विपणन

ब्रोकलीची कापणी फुलांची कळी मोठी आणि हिरवी झाल्यानंतर केली जाते. ब्रोकलीची कापणी हातने किंवा यंत्राने करता येते. कापणी केल्यानंतर, ब्रोकलीची फुलांची कळी स्वच्छ करून बाजारात



विकली जातात.

उत्पादन आणि नफा

ब्रोकलीचे उत्पादन हे लागवडीच्या पद्धती, हवामान, जमिनीची गुणवत्ता आणि इतर घटकांवर अवलंबून असते. भारतात, ब्रोकलीचे सरासरी उत्पादन प्रति एकर ४० ते ५० किंटल असते.

ब्रोकलीचा नफा हा उत्पादनाच्या किमतीवर अवलंबून असतो. भारतात, ब्रोकलीची किंमत प्रति किंटल ३५०० रुपयांपर्यंत असते. प्रती एकर उत्पादन ५० किंटल उत्पादन निघणार असे गृहीत धरले तर १ लाख ७५ हजार रुपये उत्पन्न मिळेल.

याप्रमाणे तुम्ही एक एकर शेतीतून प्रत्येकी ३ ते ४ महिन्यात १ लाख ७५ हजार रुपयांचे उत्पादन घेऊ शकता.

ब्रोकोली विकायचे कुठे -

स्थानिक किरकोळ दुकानांमध्ये विक्री हा आणखी एक चांगला पर्याय आहे. स्थानिक किरकोळ दुकानांना विक्री करण्यासाठी, तुम्हाला तुमच्या स्थानिक किरकोळ दुकानांशी संपर्क साधावा लागेल आणि त्यांना तुमच्या उत्पादनाची ऑफर करावी लागेल. किंवा नागपूर आणि पुणे सारख्या ठिकाणी मोठी भाजीपाला मंडी (बाजारात) शेत माल नेऊ शकता.

ब्रोकोली लागवडीतून नफा मिळवण्यासाठी टिप्स

योग्य पद्धतीने लागवड करणे, चांगल्या दर्जाचे बियाणे वापरणे, योग्य अंतरावर रोपे लावणे, पाणी आणि खतांचे योग्य व्यवस्थापन करणे, रोग आणि किडींपासून संरक्षण करणे, ब्रोकली ही एक पौष्टिक भाजी आहे जी भारतात वाढत्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. ब्रोकली लागवड हा एक फायद्याचा व्यवसाय असू शकतो, परंतु त्यासाठी योग्य ज्ञान आणि तंत्रांची आवश्यकता आहे.

# तेलघाणीतील पेंडीपासून खाद्यपदार्थांची निर्मिती

अकोला जिल्ह्यात सिसा (उदेगाव) येथे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) कार्यरत आहे. केंद्रातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. त्यापैकी अलीकडील काळातील सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे घाण्यावर खाद्यतेलनिर्मिती. मात्र तेवढ्यापुरते न थांबता केव्हीकेने तेलनिर्मितीनंतर तयार होणाऱ्या उपउत्पादनापासून म्हणजे पेंडीचे (डी ऑइल्ड केक) मूल्यवर्धन करण्याचे ठरविले. आज समाजात आरोग्यविषयक जागरूकता कमालीची वाढली आहे. दैनंदिन आहार पद्धती, आरोग्यवर्धक तेलांचा वापर याबाबत ग्राहक जागरूक झाला आहे. केव्हीकेने हीच संधी ओळखून त्यानुसार या मूल्यवर्धनाचे उद्योगात रूपांतर करण्याच्या दृष्टीने पावले टाकली आहेत.

प्रकल्पातून मिळाली मूल्यवर्धनाची दिशा या केव्हीकेकडे सन २०२०- २१ मध्ये एक प्रकल्प येऊ घातला. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय व सी-डॅक कोलकत्ता यांच्यातर्फे संयुक्तपणे चालवल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचे 'शुद्धता' असे नाव होते. शेंगदाणासारख्या तेलातील भेसळ निश्‍चित करण्यासाठी ई-नाक आणि ई-जीभ या इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानावर हा प्रकल्प होता. त्यात केव्हीकेकडे नमुना पृथ्थकरणाचे काम होते. त्याचबरोबर तेलनिर्मितीत तयार होणाऱ्या पेंडीचे अर्थात 'डी ऑइल्ड केक' चे मूल्यवर्धन करण्याची दिशा केंद्राला मिळाली. त्यातून केव्हीकेच्या गृहविज्ञान शाखेच्या विषय विशेषज्ज्ञ कीर्ती देशमुख यांनी पुढाकार घेतला. त्यांना केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. उमेश ठाकरे यांचे मार्गदर्शन मिळाले. पेंडींपासून विविध खाद्यपदार्थांचे प्रयोग व रेसिपी तयार होऊ लागली.



विविध पदार्थांची निर्मिती : आज या पेंडीपासून विविध पदार्थ तयार करण्यास केव्हीकेला यश आले आहे. तेलांमध्ये शेंगदाणा, तीळ, नारळ, बदाम आदींचा समावेश आहे. शेंगदाणा तेलाचे वार्षिक उत्पादन तीनहजार लिटर असून त्याचा दर २९० रुपये प्रतिलिटर आहे. बदाम तेलाचा दर लिटरला २५०० रुपये आहे. पेंडीचा समावेश करून 'मिक्स चटणी', खोबऱ्याची तसेच तिळाची चटणी तयार केली आहे. त्याचे दर किलोला ३०० ते ४०० रुपयांच्या दरम्यान आहेत. तेले, चटणी, व विविध ढेपा यांच्या विक्रीतून केव्हीकेने १२ लाख ९५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. खर्च वजा जाता सुमारे पाच लाख रुपयांचा नफा मिळवला आहे. तेल उत्पादन वाढविल्यास व उपलब्ध यंत्रसामग्रीच्या क्षमतेनुसार पूर्ण वापर केल्यास निव्वळ नफ्यात अजून काही पटीने वाढ शक्य आहे.

कच्चामालाचा वापर : उद्योगासाठी शेंगदाणा, नारळ, तीळ, बदाम आदी कच्चा माल अकोला येथील घाऊक बाजारपेठेतून आणला जातो. शेंगदाण्याचे एक लिटर तेल काढण्यासाठी अडीच किलो शेंगदाणा वापरला जातो. शेंगदाण्यामध्ये ४० टक्के, तिळात ४० ते ४३ टक्के, नारळामध्ये ५५ ते ५८ टक्के, बदामात ४० ते ४५ टक्के तेलाचे प्रमाण आहे.

केक, शंकरपाळे आदींचेही उत्पादन : याशिवाय शंकरपाळे, तीळ व शेंगदाणा चिक्की, टॉफी, कप केक, चॉकलेट बॉल, कुकीज आदी पदार्थांची निर्मिती देखील केली आहे. हे पदार्थ तयार करताना त्यातील घटकांचा केलेला समावेश प्रातिनिधीक स्वरूपात पुढीलप्रमाणे. शंकरपाळे - मैदा ७० ग्रॅम, शेंगदाणा ढेप ३० ग्रॅम, पोहे ५० ग्रॅम, मसाला १६ ग्रॅम, तेल ४००मिलि. तीळ चिक्की- तीळ ३१.५ ग्रॅम,, शेंगदाणा ढेप १३.५ ग्रॅम, गूळ ४५ ग्रॅम, तूप ५ ग्रॅम, मध ५ मिलि) टॉफी- शेंगदाणा ढेप पावडर ३० ग्रॅम, आल्याचा रस ५ मिली, मीठ २ ग्रॅम, मध ३० ग्रॅम कप केक- मैदा १९.२५ ग्रॅम, शेंगदाणा ढेप ८.२५ ग्रॅम, साखर ३० ग्रॅम

उत्पादनांचे 'प्रमोशन' : सर्व उत्पादनांसाठी संपदा हा ब्रॅण्डनेम तयार करण्यात ला आहे. त्यासाठी पेट बॉटल तसेच उत्पादननिहाय अर्धा, एक, पाच लिटर, शंभर ग्रॅम असे वजनी पॅकिंग निवडण्यात आले आहे. डॉ, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, बीज प्रमाणीकरण विभाग, आकाशवाणीसह अन्य शासकीय कार्यालयात काम करणारे अधिकारी, कर्मचारी ही उत्पादने नियमित वापरत आहेत. कृषी विभागामार्फत आयोजित प्रदर्शनांमधूनही त्यांची विक्री होते. दर महिन्याला ग्राहकांची संख्या वाढत चालली आहे. या उत्पादनांसाठी 'फूड सेफ्टी' विषयक केंद्रीय संस्थेचे प्रमाणपत्र घेतले आहे. वजने व मापे प्रमाणित केली आहेत.

उद्योग बनला प्रशिक्षणाचे केंद्र : केव्हीकेचा तेलघाणी उद्योग खरे तर उत्पादनांसह आता विविध योजनांमधील लाभार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकाचेही स्थळही ठरला आहे. या ठिकाणी पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतगत तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेतले जातात.

त्यामध्ये शेतकऱ्यांना तेल प्रक्रियेवर प्रात्यक्षिक देण्यात येते. येथे प्रशिक्षण घेतल्यानंतर अकोट, राजंदा, एरंडा, अकोला, बार्शीटाकळी येथील काही जणांनी तेल प्रक्रिया उद्योग सुरु देखील केला आहे.




## जागतिक दिवस: गोवा मुक्ती दिवस.

### महत्वाच्या घटना

१९१९ : अमेरिकेमध्ये हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.
१९२४ : जर्मनी चा सिरीयल किलर फ्रिट्ज हार्मेन याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली गेली.
१९२७ : राम प्रसाद बिस्मिल, रोशन सिंग आणि अश्फाकुल्लाह खान या क्रांतिकारकांना ब्रिटिश सरकारने फाशी दिले.
१९४१ : दुसरे महायुद्ध ॲडॉल्फ हिटलर हा जर्मन सैन्याचा सरसेनापती बनला.
११५४ : दुसरा राजा हेन्री यांचे इंग्लंड चे राजे म्हणून राज्याभिषेक झाला.
१९६१ : भारतीय सैन्याने ऑपरेशन विजय च्या माध्यमाने गोव्याच्या बोर्डर मध्ये प्रवेश केला होता.
१९६१ : पोर्तुगिजांच्या ताब्यात असलेले दमण व दीव हे प्रांत भारतात समाविष्ट करण्यात आले.
१९६३ : झांजिबारला (युनायटेड किंगडमकडून) स्वातंत्र्य मिळाले आणि तेथे सुलतान जमशिद बिन अब्दूल्लाह यांची राजसत्ता अस्तित्त्वात आली.
१९८३ : ब्राझिलमधील रिओ डी जानिरो येथुन 'फिफा वर्ल्ड कप' चोरीस गेला.
१९९८ : अमेरिकेच्या डेनवर मध्ये विश्व विकलांग स्कीइंग मध्ये शील कुमार यांना सर्वोत्तम खेळाडू म्हणून पुरस्कार वितरीत.
२००२ : व्ही. एन. खरे यांनी भारताचे ३३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२००६ : शैलजा आचार्य ह्या भारतासाठी नेपाळ च्या पहिल्या राजदूत बनल्या होत्या.
२००७ : ब्लादीमर पुतीन यांना टाईम्स मग्झीन ने पर्सन ऑफ़ द ईयर ने पुरस्कृत केले.
२०१२ : ज्यून-हाय पार्क ह्या दक्षिण कोरिया च्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५२ : अल्बर्ट मायकेलसन - वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक (१९०७) मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: ९ मे १९३१)
१८९४ : कस्तुरभाई लालभाई - दानशूर व राष्ट्रवादी विचारसरणीचे उद्योगपती, पद्मभूषण (१९६९), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक (१९३७ १९४९). अरविंद मिल्स, अशोक मिल्स, अतुल असे अनेक गिरण्या व कारखाने त्यांनी चालू केले. आपल्या गिरण्य़ांत त्यांनी कामगार कल्याणासाठी सहकार संस्था काढल्या. (मृत्यू: २० जानेवारी १९८०)
१८९७ : अमेरिकेचे मुख्य धर्मोपदेशक मार्टिन लूथर किंग सीनियर यांचा जन्म.
१८९९ : मार्टिन ल्यूथर किंग - मानवाधिकारांसाठी आजीवन संघर्ष करणारे नेते (मृत्यू: ११ नोव्हेंबर १९८४)
१९०६ : लिओनिद ब्रेझनेव्ह - रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (मृत्यू: १० नोव्हेंबर १९८२)
१९१९ : ओमप्रकाश बक्षी ऊर्फ 'ओमप्रकाश' - चरित्र अभिनेते (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९१९)
१९३४ : प्रतिभा पाटील - भारताच्या १२ व्या आणि पहिल्या महिला राष्ट्रपती.
१९६६ : भारतीय क्रिकेटपटू राजेश चौहान यांचा जन्म.
१९६९ : भारतीय क्रिकेटपटू नयन मोंगिया यांचा जन्म.
१९७४ : रिकी पॉन्टिंग - ऑस्ट्रेलियन क्रिकेट कर्णधार व फलंदाज.
१९८४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री अंकिता लोखंडे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : एमिली ब्राँट - इंग्लिश लेखिका (जन्म: ३० जुलै १८१८)
१८६० : लॉर्ड जेम्स ॲन्ड्र्यू ब्राउन रॅमसे - डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल (१८४८-१८५६), त्यांनी सार्वजनिक बांधकाम खाते स्थापन करुन सुमारे ३,४०० किमी लांबीचे रस्ते केले. टपाल व तार यांची सेवा सुरू केली. मुंबई ते ठाणे हा लोहमार्ग त्यांच्याच कारकीर्दीत सुरू झाला. (जन्म: २२ एप्रिल १८१२)
१९१५ : अलॉइस अल्झायमर - जर्मन मेंदुविकारतज्ञ (जन्म: १४ जून १८६४)
१९२७ : राम प्रसाद बिस्मिल - क्रांतिकारक (जन्म: ११ जून १८९७)
१९२७ : क्रांतिकारक अश्फाकुला खान यांचे निधन. (जन्म: १९००)
१९८८ : ज्ञानपीठ पुरस्कार पुरस्कार विजेते गुजराती साहित्यकार उमाशंकर जोशी यांचे निधन.
१९९७ : सोनीचे सहसंस्थापक मासारू इबकू यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९०८)
१९९७ : डॉ. सुरेन्द्र बारलिंगे - स्वातंत्र्यसैनिक, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २० जुलै १९१९)
१९९८ : जनार्दन विठ्ठल तथा जे. एल. रानडे - भावगीतगायक
१९९९ : हेमचंद्र तुकाराम तथा बाळ दाणी - रणजी व कसोटी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (जन्म: २४ मे १९३३).

# खांडवी परिसरातील तांड्यावरील विविध समस्या सोडवा

## एसएफआयची मागणी: जिल्हाधिकारी, जि. प. सीईओ, तहसीलदार, बीडीओ यांना निवेदने

बीड । प्रतिनिधी

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)ने गेवराई तालुक्यातील खांडवीमधील तुकानाईक व अंबुनाईक तांडा येथील शिक्षण, आरोग्य आणि रस्त्याच्या समस्यांना घेऊन आक्रमक झाली आहे. येथील समस्यांचे निवेदन एसएफआयने जिल्हाधिकारी, जि. प. सीईओ, तहसीलदार आणि बीडीओ यांना दिले आहे. पुढील १५ दिवसात मागण्या सोडविण्यात याव्यात; अन्यथा गावाकऱ्यांना सोबत घेऊन एसएफआय च्यावतीने १ जानेवारीपासून जि. प. समोर बेमुदत आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा एसएफआयने दिला आहे. गेवराई तालुक्यातील खांडवी गाव अंतर्गत येणाऱ्या तुकानाईक आणि अंबुनाईक तांडा येथे शिक्षण व आरोग्याची दुरावस्था झालेली आहे. तसेच रस्ता खराब झाला असून रस्त्यात मध्येच अर्ध्या रस्त्याचे काम झालेले नाही. याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन या समस्या मार्गी लावणे आवश्यक आहे. तांड्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सतत गैरहजर राहत असल्यामुळे आणि सतत वेळेवर हजर न राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. याबाबत गेल्या दोन वर्षापासून एसएफआयने गावकऱ्यांना सोबत घेऊन मा. पं. स. गेवराई आणि मा. शिक्षणाधिकारी जि. प. बीड यांना निवेदन देखील दिलेले आहे. त्याचबरोबर मा. तहसीलदार यांना देखील निवेदन दिले होते. परंतु प्रशासनाने या प्रश्नाकडे गंभीर दुर्लक्ष केले. त्यामुळे आता एसएफआय आक्रमक झाली आहे.



दोन्ही तांड्याला जोडणाऱ्या रस्त्याचे गेल्या पाच वर्षांपूर्वी डांबरीकरण झाले होते. परंतु ते आता खराब झाले आहे. रस्त्यात सर्वत्र खड्डे झालेत. त्यामुळे रस्त्याचे दुरुस्तीकरण करणे आवश्यक आहे. तसेच रस्त्यात मध्येच अर्धा रस्ता झालेलाच नाही. तेथील उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करणे गरजेचे आहे. तुकानाईक तांडा येथील अंगणवाडीचे काम होऊन आठ वर्षे उलटून गेली. तरीसुद्धा त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज व इतर साहित्याची पूर्तता झालेली नाही. त्याकडे लक्ष देऊन हा प्रश्न सुद्धा मार्गी लावण्यात यावा. खांडवी अंतर्गत असलेले आरोग्य सेवक हे नेहमी गैरहजर असतात. तुकानाईक तांडा व अंबुनाईक येथे नेहमी लोकांच्या आरोग्याची तपासणी व्हायला हवी. ती देखील होत नाही. त्यामुळे येथील आरोग्याकडे लक्ष देण्यात यावे. या सगळ्या बाबींची पूर्तता व्हावी, अशी मागणी एसएफआयने प्रशासनाकडे केली आहे. या आंदोलनास डीवायएफआयने संपूर्ण पाठिंबा दिला आहे. एसएफआयच्या प्रमुख मागण्या : (१) तुकानाईक तांडा व अंबुनाईक तांडा, खांडवी येथून गेवराईला जोडणाऱ्या रत्याचे दुरुस्तीकरण करावे. तसेच मध्येच सोडलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करावे. (२) तुकानाईक तांडा व अंबुनाईक तांडा, खांडवी येथील जि. प. शाळेतील शिक्षक बदली करून देण्यात यावे. (३) तुकानाईक तांडा येथील अंगणवाडीत शौचालय व मूलभूत सोईसुविधा पुरविण्यात याव्यात. (४) खांडवी आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक यांना वेळेवर हजर राहण्याची ताकीद देण्यात यावी. नसता त्यांची बदली करून नवीन आरोग्य सेवक देण्यात यावा. या समस्यांवर लवकरच तोडगा काढला जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. पुढील पंधरा दिवसात तोडगा न निघाल्यास नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी १ जानेवारीला प्रशासनाच्या दारात समस्त गावाकऱ्यांना सोबत घेऊन एसएफआयच्या वतीने बेमुदत आंदोलन करण्यात येईल. याची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. असा इशारा एसएफआयचे राज्य सचिव रोहिदास जाधव, जिल्हा उपाध्यक्ष शिवा चव्हाण, जिल्हा कमिटी सदस्य युवराज चव्हाण, विलास राठोड, अरुण राठोड, सचिन राठोड, राहुल चव्हाण, सुहास जायभाये, विनायक चव्हाण, राम शेळके, किरण घाटगे, रुक्मिणी नागापुरे, अरुण राठोड, राहुल जाधव, विकास जाधव, गणेश राठोड, आनंद चव्हाण, पंडित चव्हाण यांनी दिला आहे.

# पुणे येथील पहिल्या बाल संमेलनात बीडच्या ३६ विद्यार्थ्यांचा सहभाग

## यात २० कलावंत दिव्यांग: प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या घटक संस्था असलेल्या बालरंगभूमीचे पहिले बाल संमेलन दिनांक २० ते २२ डिसेंबर २०२४ दरम्यान पुणे येथील अण्णाभाऊ साठे रंगमंदिरात संपन्न होणार असून, बीड जिल्ह्यातील आठ शाळेतील ३६ विद्यार्थी कलावंताचा सहभाग असणार आहे. तर यात २० दिव्यांग कलावंतांचा सहभाग असल्याचे बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी कळवले आहे.

पुणे येथील बिवेवाडी भागातील अण्णाभाऊ साठे रंगमंदिरात व परिसरात हे पहिले बालसंमेलन होत आहे. यात महाराष्ट्रातील २८ शाखेचा सहभाग असणार आहे. संगीत,नृत्य, साहित्य, नाट्य, चित्रकला, शिल्पकला, जादूचे प्रयोग, कला प्रदर्शन, कार्यशाळा, शोभायात्रा असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे. यात बीड जिल्ह्यातील आर्युंमगलम निवासी मूक बधीर विद्यालय बीड ( नृत्य व चित्रकला प्रदर्शन), प्रज्ञा चक्षू अंध निवासी, विद्यालय बीड (गायन), माध्यमिक आश्रम शाळा गेवराई (संबळ वादन), मुबकधीर निवासी शाळा नेकनूर (चित्रप्रदर्शन),मानव विकास निवासी मूकबधीर विद्यालय, अंबाजोगाई (नृत्य),पोदार इंटरनॅशनल स्कूल बीड (शेतकरी गीत) द कॅब्रेजी व्हॉली इंटरनॅशनल स्कूल गेवराई (धनगरी नृत्य) चे विद्यार्थी सहभागी होणार आहे.शिवाय याचे मार्गदर्शक शिक्षक, पालक व परिषदेचे पदाधिकारी असे ६० जण या संमेलनास बीडहून जात आहे.बीड नाट्य परिषदेने राबविलेल्या सर्व उपक्रमांचे महाराष्ट्रभर कौतुक होत असून एखादया संमेलनास बीड जिल्ह्याभरातून विद्यार्थी जाण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी कळवले आहे.

या कलावंत विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.संजय पाटील देवळाणकर, डॉ. विश्वांभर देशमाने, मिलींद शिवणीकर, विलास सोनवणे, स्नेहल पाठक, अनुराधा चिंचोलकर, नामदेव साळूंके,अमित गाडे, दिपक जमधाडे, सुरेश थोरात, विजय राख, सुहास पालीमकर आदिंनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेकडे लेखी तक्रारी द्याव्यात : मुळूक,गलधर

## पवनचक्कीवाल्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे दिवसेंदिवस पसरत असून गुंडगिरी ही वाढत आहे. शेतात पवनचक्की उभारण्यासाठी या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. पवनचक्की कंपनीच्या त्रासाला आणि गुन्हेगारीला वैतागून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवनचक्की कंपन्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक झाली असून पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रारी द्याव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

जिल्ह्यात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही.



शेतकऱ्यांनी मावेजा मागितल्यास स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर कंपनीचे अधिकारी पोलिसांना हाताशी धरुन उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. पवनचक्कीवाल्यांकडून शेतकऱ्यांची रितसर परवानगी न घेता त्यांच्या शेतामधून तार ओढण्याचे काम केले जात आहे. पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागून सुलतानपूर येथील एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला तर नाईकवाडे नामक शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रकार घडला आहे. ज्या गावात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे त्या गावात या कंपनीकडून स्थानिक गुंडांना हाताशी धरून शेतकऱ्यांना धमकवण्याचे व फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला वैतागून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आता पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना आक्रमक झाली आहे. पवन चक्की कंपनीकडून जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी कागदपत्रांसह शिवसेना बीड जिल्हा कार्यालय बार्शी रोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल कराव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

# सीसीआयच्या जाचक अटी कमी कराव्यात-धनंजय गुंदेकर

बीड। प्रतिनिधी



प्रतिकूल हवामान परिस्थिती शेतकरी कापूस उत्पादन घेत आहेत. बीड जिल्ह्यातील बऱ्याचशा भागात कापूस उत्पादन घेणे बंद केले आहे. ज्या भागात पिकवला जातो त्या शेतकऱ्यांना खर्चाच्या तुलनेत भाव मिळत नसल्याचे शेतकरी सांगताहेत. शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ११००० रुपये भाव आवश्यक असताना सध्या खाजगी बाजारात ७००० पेक्षा कमी दर मिळत आहे.

सरकारने हमीभाव खरेदीसाठी सीसीआय केंद्रे सुरू केले असून ही केंद्रे ''असून अडचण नसून खोळंबा'' अशी झालेली आहेत. कापसातील ओलावा (मॉईश्चर) १२% पेक्षा अधिक असेल तर शेतकऱ्यांच्या कापसाला सीसीआय कडे विकता येत नाही, त्यासोबतच धाग्याच्या लांबी अनुषंगाने हमीभाव ७५२१ असताना देखील बीड मध्ये मात्र ७४२१ रुपये देण्यात येतो आहे. या दोन्ही अटीमुळे शेतकऱ्यांना इच्छा नसताना आपला कापूस सीसीआय ऐवजी खाजगी व्यापाऱ्यांना द्यावा लागत आहे. यात शेतकऱ्यांचे प्रती क्विंटल ४०० ते ५०० रुपयांचे नुकसान होत असून यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट तयार होत आहे. विद्यमान महायुती सरकार मधील अनेक लोकप्रतिनिधींनी निवडणूक काळात कापूस व सोयाबीन प्रश्ने मार्गी लावू असे आश्वासन दिले होते या आश्वासनांचा विसर या लोकप्रतिनिधींनी पडू न देता शेतकऱ्यांना या जाचक अटीतून वाचवावे अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागेल असं आवाहन प्रसिध्दी पत्रकाद्वारे संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

# शहिंशाहवली दर्गाह तलाव परिसरालगतचे नागरिक भोगताहेत नरक यातना

## मौलाना आझाद युवा मंचने पाहणी करून दिला आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

शहरातील शहिंशाहवली दर्गाह तलाव परिसरालगत ना रस्ते, ना नाल्या. संपूर्ण वस्तीतील घाण व सांडपाणी रस्त्यांवरून वाहत असल्याने येथील नागरिक अक्षरशः नरक यातना भोगत असल्याची माहिती मौलाना आझाद युवा मंच चे बीड जिल्हाध्यक्ष अरफात खान, सामाजिक कार्यकर्ते तथा भावी नगरसेवक अख्तर पेंटर आणि सय्यद सलमान यांनी पाहणी करून आंदोलनाचा इशारा दिला आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शहिंशाहवली दर्गाह तलाव परिसरालगतचे नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून येथे येता-जाता गलीच्छतेला तोंड देत अक्षरशः नरक यातना भोगत आहेत. या अवस्थेची माहिती अरफात खान, अख्तर पेंटर, सय्यद सलमान यांना मिळाल्यानंतर त्यांनी अरबाज शेख, सोहेल शेख यांच्यासह मौलाना आझाद युवा मंच चे अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यादरम्यान या परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. येथील महिला पुरुषांसह आबालवृद्ध देखील येथे राहताना सोसाव्या लागत असलेल्या हाल अपेष्टा विषद केल्या. हे ऐकून या सर्वांचे हृदय हेलावले आणि अरफात खान यांनी येथील रहिवाशांना शब्द दिला की, जोपर्यंत या परिसरात चांगले रस्ते आणि नाल्यांचे निर्माण कार्य प्रत्यक्षात सुरू होत नाही, तोपर्यंत या भागासाठी बीड नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करू तसेच लवकरच बीड नगरपरिषद सह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने मौलाना आझाद युवा मंच कडून उग्र आंदोलन करू असे म्हणत आंदोलनाचा इशारा दिला आहे. शिवाय लवकरच बीड नगरपरिषद मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना भेटून येथील समस्या आणि प्रचंड त्रास व नरक यातनेची दखल घेत विकास कामे करायला लावू असेही म्हटले. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड तालुक्यातील अपंगाचे हाल कमी होईनात-शाहू डोळस

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अपंग गेल्या वर्षी २०२३ मध्ये तहसील कार्यालय बीड यांच्या संजय गांधी कमेटीने मिटिंग घेऊन तालुक्यातील योग्य ते लाभ धारक यांची कमेटीने निवड करून व सर्वां कडून योग्य ते कागदपत्र घेऊन दोन वर्ष झाले आहेत. तरी तहसील प्रशासन या गंभीर बाबी कडे लक्ष देत नाहीत ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. ज्या अपंग बांधवाचे जीवनमान या तुटपुंज्या आर्थिक सहयावर आहे ते देखील त्यांना वेळेवर मिळत नाही. दोन वर्ष होऊन जर अपंगचा पगार वेळेवर होत नसेल तर तहसीदार साहेब याला कोणती शाही म्हणायचं?



कागदपत्र गोळा करताना अपंगची किती दमछाक होते, तरी आपले प्रशासन या महत्वाच्या बाबीकडे कानाडोळा करत आहे हे योग्य नाही. अपंग बांधवावर उपासमारीची आपन वेळ आणलेली आहे. या महागाईच्या काळात तहसीलदार साहेबांनी अपंगा प्रति सहानुभूती व्यक्त करून त्यांच्या हक्काचे पगार ताबडतोब त्यांचे खातेवर टाकण्यात यावा नसता ना विलाजास्तव आम्हाला बीड तहसील च्या विरोधात तीव्र आंदोलन करावे लागेल. असा इशारा प्रहार अपंग क्रांती आंदोलन चे जिल्हा उपाध्यक्ष शाहू (अप्पा )डोळस यांनी प्रशिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे. याची सर्वस्वी जबादारी तहसील यांची राहील.

# ई-केवायसी न झाल्यास जिल्ह्यातील रेशन कार्डधारक लाभापासून वंचित राहणार

## राशन दुकानदारांच्या मागणीकडे लक्ष देणे आवश्यक!

बीड। प्रतिनिधी

शासनाने सर्व राशन कार्डधारकांना ई-केवायसी करून घेणे आवश्यक असल्याचे म्हटले असले आणि महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यात राशन कार्ड धारकांचे ई-केवायसी करण्यात आले असले तरी फक्त बीड जिल्हा राशन कार्ड धारकांचे ई-केवायसी करण्यात मोठ्या प्रमाणात मागे राहिला आहे. हे पाहता शासनाने दिलेल्या ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या मुदतीत संपूर्ण बीड जिल्ह्यातील राशन कार्ड धारकांचे ई-केवायसी पूर्ण करण्यात आले नाही तर बीड जिल्ह्यातील हजारो राशन कार्ड धारक शासनाकडून राशन कार्ड द्वारे मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहतील. याला कारण बीड जिल्ह्यातील राशन दुकानदारांची मागणी ठरणार आहे. म्हणून आता जिल्हाधिकारी यांनीच याकडे जातीने लक्ष घालून येत्या ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी राशन कार्ड ची ई-केवायसी मुदत संपण्यापूर्वी राशन कार्ड धारकांचे ई-केवायसी पूर्ण करण्याचे आदेश देऊन त्यावर अंमलबजावणी करून घेणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.




जेव्हापासून शासनाने राशन कार्ड ची ई-केवायसी करण्याचे आदेश दिले आहे, तेव्हापासून महाराष्ट्रभरातील अनेक जिल्ह्यातील तहसील कार्यालय, पुरवठा विभाग आणि राशन दुकानदार यासाठी कामाला लागले होते आणि बहुतेक बीड जिल्हा वगळता राज्यातील बहुतांश जिल्ह्यांनी राशन कार्ड धारकांची ई-केवायसी करून घेतली आहे. परंतु प्रत्येक बाबतीत अपवाद आणि मागास ठरत असलेला बीड जिल्हा यात सुद्धा मागे राहिला आहे. या जिल्ह्यातील राशन दुकानदारांनी राशन कार्ड ची ई-केवायसी करण्याकरिता शंभर रुपये दर आकारणी राशन कार्ड धारकांकडून वसूल करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी केली होती परंतु याची दखल न घेतली गेल्याने तसेच या कामी शासनाकडून अतिरिक्त कमिशन किंवा रक्कम त्यांना देण्यात येत नसल्याने म्हणा, बीड जिल्ह्यातील राशन दुकानदारांनी आतापर्यंत राशन कार्ड धारकांची ई-केवायसी करण्याचे कार्य सुरू केलेले नाही. एकाध दुसरा अपवाद वगळता विना मोबदला राशन कार्ड धारकांची ई-केवायसी न करण्याच्या आपल्या भूमिकेवर सर्व राशन दुकानदार अजूनही ठाम असल्याचे तसेच ई-केवायसी करत नसल्याचे दिसत आहे. जर ३१ डिसेंबर पूर्वी बीड जिल्ह्यातील राशन कार्ड धारकांची ई-केवायसी करण्यात आली नाही तर मात्र राशन दुकानदार, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय आणि जिल्हा प्रशासन तसेच शासन या सर्वांच्या मध्ये राशन कार्ड धारक राशन कार्डद्वारे मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहणार आहेत. म्हणजेच भरडले जाणार आहेत. परंतु याचे कुठलेही सोयरसुतक पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, जिल्हा प्रशासन यापैकी कोणालाही असल्याचे दिसत नाही. राशन कार्ड धारकांची ई-केवायसी करण्याकरिता शासनाने दिलेली मुदत संपायला आता फक्त १२ दिवसांचा कालावधी उरला आहे. या १२ दिवसाच्या आत जर बीड जिल्ह्यातील राशन दुकानदारांकडून राशन कार्ड धारकांची ई-केवायसी करण्यात आली नाही तर मात्र राशन कार्ड धारक राशन कार्डद्वारे मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहतील. याकडे पुरवठा विभाग, तहसील कार्यालय आणि जिल्हा प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज असून याविषयी युद्ध पातळीवर पावले उचलण्याची गरज आहे. असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृती व्याख्यान




नेकनूर। प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर व एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र स्त्री व कुटीर रूग्णालय, नेकनूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब अंतर्गत एचआयव्ही.एड्स जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के तर अतिथी म्हणून वैद्यकीय अधीक्षक डॉ. हुबेकर ए. आर., समुपदेशक गोरे एस. एस.यांची उपस्थिती होती.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रूग्णालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली 'जागतिक एड्स पंधरवडा' निमित्ताने सदरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना गोरे एस. एस. यांनी म्हटले की, एड्स हा रोग ह्युमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस (एचआयव्ही) द्वारे होतो. एचआयव्ही शरीरातील रोगप्रतिकारक पेशी नष्ट करतो किंवा त्याचे नुकसान करतो. तसेच त्यांनी एड्स लक्षणे व घ्यावयाची काळजी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. डी. के. ढास यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की,१ डिसेंबर प्रत्येक वर्षी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने एड्स या आजारासंबंधी जागरूकता वाढवणे, एड्स या साथीच्या संसर्गाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. करिता एचआयव्ही विरुद्ध लढ्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. मुजावर एस. टी. तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश काळे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यायातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र

गुरूवार, दि.१९ डिसेंबर २०२४ | ६

# जलजीवन मिशनच्या प्रशिक्षणाची धुरा बोगस प्रशिक्षकांच्या खांद्यावर

## यशदाच्या प्रशिक्षित प्रशिक्षकांनी केली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये स्टुडंट्स रिलीफ सोसायटी जयपुर (राजस्थान ) या संस्थेमार्फत जलजीवन मिशनचे प्रशिक्षण सध्या सुरू असून हे प्रशिक्षण तालुका स्तरावर घेतले जाते. बीड जिल्ह्यात जवळपास २० यशदा पुणे आणि मित्रा नाशिक या संस्थेकडून प्रशिक्षण घेतलेले प्रवीण प्रशिक्षक असतानाही या संस्थेने बाहेरचे लोक आणून प्रशिक्षण सुरू केले आहे. या मागचा नेमका हेतू काय याबद्दल शंका व्यक्त केली जात असून बोगस प्रशिक्षणार्थी दाखवून कोट्यावधी रुपये लुटण्यासाठीच जिल्ह्यातील प्रशिक्षीत प्रशिक्षकांना डावलले जात आहे. असा आरोप या प्रशिक्षकांनी केला आहे. दरम्यान या प्रशिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून या संस्थेची चौकशी करावी अशी मागणी केली आहे.**

बीड जिल्ह्यात राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीज सोसायटी जयपुर या संस्थेमार्फत प्रशिक्षण दिले जात आहे. ग्रामपंचायत स्तरावर नळ जोडणी दुरुस्ती व देखभाल योग्य पद्धतीने न करता शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याचे आढळून येत असल्याने या प्रशिक्षणातून गावातील योजनेची माहीती व्हावी म्हणून संबंधित लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी हे प्रशिक्षण आहे. मात्र या योजनेचा लाभ लोकांना होतांना दिसत नाही. कारण यासाठी जे



प्रशिक्षक बाहेरून आणले आहेत ते प्रशिक्षित प्रशिक्षक नसून बीड जिल्ह्यामध्ये २० प्रशिक्षक प्रशिक्षित असतानाही बाहेरून प्रशिक्षक बोलावण्याचा संस्थेचा नेमका हेतू काय ? हे स्पष्ट होत नाही. जिल्ह्यातील प्रवीण प्रशिक्षकांना रोजगारापासून वंचित ठेवून हेतू पुरस्सर संस्थेने बाहेरून प्रशिक्षक मागवले आहेत .वास्तविक पाहता या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक निवडण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे ते जे देतील तेच प्रशिक्षक या संस्थेने घेतले पाहिजेत. मात्र बीडमध्ये तसे होताना दिसत नाही .संस्थेची मनमानी चालू असून शासन निर्णयानुसार कुठलेही काम होताना दिसत नाही. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्या बाहेरील लोक बोलावून प्रशिक्षण अक्षरश: गुंडाळले जात आहे. वास्तविक पाहता गावातील पाच लोकांना हे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. यामध्ये सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी ताई आशा वर्कर, जलसुरक्षक या पाच लोकांना हे प्रशिक्षण प्रवीण प्रशिक्षका मार्फत दिले जाणे अपेक्षित आहे .मात्र या संस्थेकडून व्यवस्थित सर्वांना निरोप दिले जात नाहीत. कमीत कमी लोक कशे येतील याची काळजी घेतली जाते आणि पैसे मात्र पूर्ण लोकांचे उचलले जातात .या प्रशिक्षणावर लक्ष ठेवण्याचे काम उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे आहे. मात्र त्यांच्याकडूनही या प्रशिक्षणाला भेटी दिल्या जात नाहीत. किंवा तालुका स्तरावर गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी या प्रशिक्षणाकडे फिरकत नाहीत. त्यामुळे ही मनमानी चालू असून स्टुडंट्स रिलीफ सोसायटी जयपुर या संस्थेकडून थातूरमातूर प्रशिक्षण देऊन कोट्यावधी रुपयाचा निधी जिल्ह्यातून नेला जात आहे. हे प्रशिक्षण थांबवून जिल्ह्यातील प्रशिक्षकांना नेमून हे प्रशिक्षण पूर्ण करावे नसता जिल्ह्यातील यशदा प्रशिक्षित प्रशिक्षकांनी जिल्हा परिषदेसमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

### या संस्थेच्या विरोधात हिंगोलीतही तक्रार

स्टुडंट्स रिलीफ सोसायटी जयपूरच्या वतीने हिंगोली जिल्ह्यातही असेच थातूरमातूर प्रशिक्षण दिले जात आहे .या ठिकाणीही अनुभवी प्रशिक्षकांना डावलून बाहेरचे लोक आणून प्रशिक्षण गुंडाळण्याचा कार्यक्रम चालू आहे. येथील प्रशिक्षकांनी या बाबीला विरोध करत जिल्ह्यातीलच प्रशिक्षक नेमून हे काम पूर्ण करावे अशी मागणी हिंगोली जिल्ह्यातील प्रशिक्षक करत आहेत. विशेष म्हणजे या ठिकाणीही संबंधित संस्थेच्या प्रतिनिधीशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तर मिळत आहे. त्यामुळे या प्रशिक्षकांनी उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे तक्रार करून या संस्थेची चौकशी करावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर सिद्धार्थ खंदारे, सय्यद कलिम,आकाश खंदारे, आनंद अभिषेक, धोंडीबा पाईकराव आदींसह जवळपास दहा जणांच्या साह्या आहेत.

# अमित शहा यांनी तमाम आंबेडकरी जनतेची तात्काळ माफी मागावी

### काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांची मागणी

### केंद्रीय गृहमंत्री मंत्र्यांचे बेताल वक्तव्य

### आंबेडकरी जनतेत प्रचंड असंतोष



**माजलगाव । प्रतिनिधी**

देशाच्या सर्वोच्च सभागृहात भाषण करत असताना केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल समस्त आंबेडकरी समुदायाची माफी मागावी, अन्यथा गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल, असा इशारा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी दिला आहे.



सविस्तर वृत्त असे की, देशाचे केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी, लोकसभा सभागृहात, ''आंबेडकर आंबेडकर आंबेडकर ही आत्ता फॅशन झाली आहे, एवढ्या वेळा देवाचं नाव घेतले असते तर एखाद्याला स्वर्गात जागा मिळाली असती '', असे बेताल वक्तव्य करत देशातील समस्त आंबेडकरी समुदायाच्या भावना दुखावल्या असून, सदरील वक्तव्यातून भाजपा आणि संघांची जातीय द्वेष आणि आंबेडकर यांच्याबद्दल असणारी जळकुटी भावनाचं पुन्हा एकदा उलगडा होत आहे. तसेच आंबेडकरांच्या बद्दल बोलत असताना, देवाचे नाव पुढे करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तमाम आंबेडकरी समुदायास अपमानीत करण्याच्या उद्देशाने केलेल्या वक्तव्याने देशातील समस्त आंबेडकरी समुदायाच्या भावना दुखावल्या असून, भाजपा नेते अमित शहा यांनी तातडीने देशाची माफी मागावी, अन्यथा देशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणाऱ्या ◀◀ पान ३ वर

# मंझरी (घाट) जलजीवन योजनेंतर्गत कामाच्या चौकशीसाठी दोन दिवसांपासून ग्रामस्थांचे उपोषण

### तातडीने काम सुरु करण्याच्या लेखी आश्वासनानंतर बेमुदत उपोषण मागे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मंझरी ( घाट) येथील ग्रामस्थ जलजीवन योजनेंतर्गत ६७ लक्ष रूपये कामाच्या निकृष्ट दर्जाचे व रखडलेले काम पूर्ण करण्यात यावे यासाठी २ दिवसांपासून ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले असुन २ दिवसात जलजीवन आधिका- यांनी उपोषणाची दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना विनंती केल्यानंतर डॉ.गणेश ढवळे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेत राजेंद्र मोराळे प्रकल्प जलजीवन मिशन जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद सांधत ग्रामस्थांची कैफियत मांडली. राजेंद्र मोराळे यांनी संबंधित उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा कुलकर्णी यांना फोन करून आंदोलनस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या ऐकून निराकरण करण्यात येईल असे डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.



पाटोदा तालुक्यातील ६५० लोकसंख्या असलेल्या मंझरी ( घाट) गावातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत २ वर्षांपूर्वी ६७ लाख रुपये मंजूर झाले. गेल्यावर्षी पावसाळयात गावातील सिमेंट रस्ते खोदून निकृष्ट दर्जाचे पाईप टाकण्यात आले. विहिरीचे काम करण्यात आले नाही. टाकीचे काम निकृष्ट असुन पाणी मारले नाही. योजना अपुर्ण असून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. वर्षभरापासून कंत्राटदार व अधिकारी यांना काम पूर्ण करण्याचे लेखी निवेदन देऊनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी दोन दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर कडाक्याच्या थंडीत बेमुदत उपोषण सुरू केले ◀◀ पान ३ वर

### तातडीने काम पूर्ण करण्याच्या लेखी आश्वासनानंतर बेमुदत उपोषण मागे

आज दुपारनंतर ४ वाजता कुलकर्णी उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा जिल्हा परिषद बीड यांनी तातडीने उर्वरित काम करण्यात येईल तसेच कामात काही त्रुटी उणिवा राहणार नाही याची दक्षता घेऊन १५ दिवसात गावाला पाणीपुरवठा करण्यात येईल असे लेखी दिल्यानंतर जयदत्त धस यांच्या हस्ते पाणी पिऊन आंदोलनकर्ते यांनी २ दिवसांपासून सुरू असलेले बेमुदत उपोषण मागे घेतले.

# बाळराजे पवारांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबीराचा नागरिकांनी लाभ घ्यावा- सुशील जंवजाळ

**गेवराई । प्रतिनिधी**

गेल्या विस वर्षांपूर्वी स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे स्वप्न गेवराईच्या दाखवुन ते स्वप्न मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या माध्यमातून साकार करणारे स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय लोकनेते बाळराजे दादा पवार याच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तरी तालुक्यातील नागरिकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन सुशील जंवजाळ, भगवान घुबार्डे, यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात केले आहे



दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात ते म्हमाले की गेवराई मतदारसंघातील लोकप्रिय लोकनेते बाळराजे दादा पवार यांचा शनिवार २१डिसेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे त्यांची जय्यत तयारी सुरु आहे तर बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतिने आरोग्य शिबीरात मधुमेह तपासणी,रक्तदाब तपासणी, हृदयरोग तपासणी, ई.सि.जी. तपासणी अशा रोग तपासणी करण्यासाठी डॉ.सुरज कोठावळे, डॉ.धनजय माने,डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड, या वैद्यकीय आधिकारी यांच्या उपस्थितीत ◀◀ पान ३ वर



**माजलगाव:-मा.ना.पंकजाताई मुंडे यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाल्यामुळे नागपूर येथे सिध्देश्वर राठोड यांनी भेट घेऊन अभिनंदन केले.**

# खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. प्रीती पोहेकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील खोलेश्वर महाविद्यालय हे एक नामांकित महाविद्यालय असून दोन वर्षांपूर्वीच या महाविद्यालयाने आपला सुवर्ण महोत्सव साजरा केला. नुकतीच या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. प्रीती पोहेकर यांची नियुक्ती करण्यात आली .डॉ.पोहेकर या यापूर्वी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर त्यांनी भा.शि.प्र. संस्थेच्या स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य पदाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला व आता त्यांची नियुक्ती संस्थेच्याच खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आली आहे.



या नियुक्तीबद्दल त्यांचा भा.शि.प्र.संस्था व खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे ◀◀ पान ३ वर

# डिघोळअंबा येथे रस्ता रोको आंदोलन

### बीड जिल्हा दहशतमुक्त करा, दलितांवरील अन्याय अत्याचार थांबवा - अक्षय भुंबे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वाढत्या अन्याय अत्याचाराच्या घटना विरोधात गांवकरी एकत्र आले व त्यांनी डिघोळअंबा येथे अंबाजोगाई - कळंब या राज्य महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी बोलताना बीड जिल्हा दहशतमुक्त करा, दलितांवरील अन्याय अत्याचार थांबवा अन्यथा जनतेला रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन करावे लागेल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अक्षय भुंबे यांनी राज्य सरकारला दिला आहे. तसेच मस्साजोगचे सरपंच मयत संतोष देशमुख व परभणी येथील मयत भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले.



सोमवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी वाढत्या अन्याय अत्याचाराच्या घटना विरोधात गांवकरी एकत्र आले व त्यांनी सामाजिक कार्यकर्ते अक्षय भुंबे यांच्या नेतृत्वात डिघोळअंबा येथे अंबाजोगाई - कळंब या राज्य महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात पुढील नमूद मागण्या करण्यात आलेल्या आहेत, १) मस्साजोग गांवचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खुन केल्याप्रकरणी एस.आय.टी.मार्फत चौकशी करून दोषी आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी., २) सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबातील व्यक्तींना शासकीय सेवेत रूजु करण्यात यावे., ३) आरोपींना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी.,

### मयत संतोष देशमुख, सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणी मुख्यमंत्र्यांना निवेदन

◀◀ पान ३ वर

# भगवान दत्तात्रय हे जीवनासाठी दिशादर्शक: स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ ज्योतिर्लिंगाच्या पूर्वेस सारडगाव पंचक्रोशीत वसलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम अध्यात्मिक उन्नती केंद्रात भगवान दत्तात्रय जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संत साहित्याचे अभ्यासक व प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी आपल्या सुमधुर वाणीत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

गुट्टे महाराज म्हणाले की, ''भगवान दत्तात्रय हे जीवनासाठी दिशादर्शक देवता आहेत. भक्ती ही सर्वात श्रेष्ठ आहे, कारण भक्तीनेच जीवनात चित्त निर्मळ होऊन ईश्वरप्राप्ती साधता येते. अनुसया म्हणजे असुयेपासून मुक्त बुद्धी आणि अत्रि ऋषी म्हणजे त्रिगुणांच्या पलीकडे गेलेली अवस्था. अशा निर्मळ चित्ताच्या पोटी भगवान दत्तात्रय प्रकट होतात.''



**श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जयंती महोत्सव साजरा; शंकराचार्य यांनी दिले प्रतिकाशीचे विशेष स्थान**

त्यांनी पुढे सांगितले की, ''दत्त म्हणजे चित्त. जेव्हा चित्त निर्मळ होते, तेव्हा ईश्वर आपले काम आपोआप पूर्ण करतो. अनुसया व अत्रि ऋषी यांचे कर्मश्रेष्ठ असल्याने ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिमूर्तींनी त्यांच्या आश्रमात येऊन उपदेश दिला. भगवान दत्तात्रयांनी धर्माचे अधिष्ठान मानण्यासाठी भारतभर भ्रमण केले व विश्वाला योग्य दिशा दिली.''

परमाराध्य परमधर्माधीश उत्तराम्नाय ज्योतिष्पीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती १००८ यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर प्रथमच दत्त जन्मोत्सव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रल्हाद महाराज घुले यांचे भक्तिमय कीर्तन झाले, तर डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी आपल्या अमृततुल्य प्रवचनातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.श्री क्षेत्र दत्तधाम अध्यात्मिक उन्नती केंद्राचे महत्त्व अधोरेखित करताना प्रवचनातून शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# लोणावळ्यात मोक्याच्या ठिकाणी असलेल्या ३० एकर जागेवरुन वाद, गावकऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना पिटाळून लावले

पुणे । प्रतिनिधी

लोणावळा येथील कैवल्य धाम या संस्थेच्या जागेचा प्रश्न ऐरणीवर आलाय. अलिबाग तालुक्यातील रांजणखार गावामध्ये असणाऱ्या एकूण ३० एकर जागेची मोजणी आज भूमिअभिलेख यांच्यामार्फत करण्यास सुरूवात झाली. मात्र, कैवल्य धाम संस्थेच्या विरोधात रांजनखार ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रांजनखर ग्रामस्थांचा जागा मोजणीला विरोध केला आहे. एक हजार ग्रामस्थ रस्त्यावर उतरले आहेत. महिलांचा देखील मोठा समावेश यामध्ये आहे. 'कैवल्य धाम चले जाव', आमचा ताबा आमची मालकी आशयाचे पोस्टर बनवून गावकऱ्यांचा संस्थेविरोधात एल्गार पुकारला आहे.



लोणावळा येथील कैवल्य धाम या संस्थेच्या जागेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अलिबाग तालुक्यातील रांजणखार गावामध्ये असणाऱ्या एकूण ३० एकर जागेची मोजणी आज भूमिअभिलेख यांच्यामार्फत करण्यास सुरूवात झाली. मात्र, रांजणखार ग्रामस्थांनी या मोजणीला तीव्र विरोध करत ही मोजणी रोखण्याचा प्रयत्न केला. यामध्ये एक हजाराहून अधिक ग्रामस्थांनी या संस्थेच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत कैवल्य धाम चले जाव, आमचा ताबा आमची मालकी अशा आशयाचे फलक बनवून जोरजोरात या संस्थेच्या विरोधात घोषणा देत आक्रमक भूमिका घेतली आहे. काही काळ येथील वातावरण तणावपूर्ण झाले होते. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीनंतर हे प्रकरण निवळले आहे.

ग्रामस्थांचा कैवल्य धाम संस्थेविरोधात का आहे विरोध?

सन १९४१ साली बिवलकर यांनी कैवल्य धाम या संस्थेस (लिज डीडने) ९९ वर्षांच्या करारावर एकून १० एकर जागा दिली होती. या जागेत गोशाळा, महिला कार्यशाळा,आणि इतर सुविधा उपलब्ध होण्याकरिता देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात या जागेत काहीच झालं नाही. ग्रामस्थांना विश्वासात न घेता १० एकर ऐवजी १५ एकरचा सातबारा फसवून तयार करण्यात आला. या जागेत १९८८ सालापासून स्थानिकांना घरे बांधण्यासाठी प्लॉट वाटप करण्यात आले. २००५ पासून या जागेचा पुन्हा वाद चिघळला आणि हा वाद आता न्यायालयात पोहोचला आहे. आता या जागेत काही ग्रामस्थांनी घरे बांधली आहेत. पुन्हा आजपासुन या जागेत कोर्टाकडून संस्थेच्या अर्जनंतर जागेची मोजणी सुरू झाली आहे, त्याला गावकऱ्यांचा विरोध सूरु झाला आहे.

# मारहाणीचा जाब विचारायला गेलेल्यांवर कोयत्याने वार; दोघे गंभीर जखमी

पुणे । प्रतिनिधी

मारहाणीचा जाब विचारायला गेलेल्या टोळक्यावर समोरील टोळक्याने कोयत्याने सपासप वार केले. यामध्ये दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. यातील एक जखमीवर स्थानबध्दतेची कारवाई झाली होती. तर आरोपींमध्ये एका तडीपार केलेल्या गुंडाचा समावेश आहे. ही घटना आंबेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत साईनगर येथील मोकळ्या मैदानावर मंगळवारी रात्री घडली.

याप्रकरणी समर्थ राकेश साळुंखे (१८, रा. कात्रज) याने तक्रार दिली आहे. त्यानूसार सोन्या कांबळे, अमोल अडाम, अमोल मदनकर, गणेश दोडमणी, चिक्या व इतर दोघांवर खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील जखमी आशिष प्रधान याच्यावर(२३) एमपीडीएची कारवाई झाली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार फिर्यादी यांचा मित्र इशांत कोकाटे यास सोन्या कांबळे, अमोल अडाम, अमोल मदनकर, गणेश दोडमणी, चिक्या यांनी मारहाण केली होती. या मारहाणीचा जाब विचारण्याकरीता फिर्यादी साईनगर गल्ली नंबर तीन येथे मित्रांसोबत गेला होता. यावेळी सोन्या कांबळे याने त्यास तु आम्हाला जाब विचारणारा कोण ? असा सवाल केला. यानंतर त्याचे साथीदार अमोल अडाम, अमोल मदनकर, गणेश दोडमणी, चिक्या व इतर दोघांस इशारे करुन कोयते घेऊन येण्यास सांगितले. ते कोयते घेऊन आल्यावर फिर्यादीचा मित्र आशिष प्रधान याच्या मानेवर वार करण्यात आले. ते बघुन फिर्यादी व त्याचे मित्र तेथून पळून जाऊ लागले. यावेळी फिर्यादी पाय घसरुण खाली पडला. ही संधी साधत आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यावर, हातावर, पायावर कोयत्यांनी वार केले. ही घटना समजताच आंबेगाव पोलीसांचे मार्शल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना त्वरीत रुग्णालयात दाखल केले. दरम्यान आरोपींचा शोध पोलीस ठाण्याची आणि गुन्हे शाखेची पथके घेत आहेत. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.

# पुणे हादरलं! नृत्य प्रशिक्षकाचा चिमुकल्या विद्यार्थिनींवर अत्याचार, पालक संतप्त

पुणे : पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. वारजे माळवाडी भागातील एका नामांकित शाळेतील ३९ वर्षीय नृत्य प्रशिक्षकाने दोन चिमुकल्या विद्यार्थिनींशी अश्लील कृत्य करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर संतप्त पालकांनी शाळेच्या प्रशासनाला जाब विचारून कारवाईची मागणी केली आहे. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलिसांनी मंगळवारी रात्री उशीरा नृत्य प्रशिक्षकावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. नृत्य प्रशिक्षक ३९ वर्षांचा असून, तो दिघी परिसरात राहण्यास आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, एका पिडीत मुलगी चौथीच्या व दुसरी सहावीच्या वर्गात शिकते. शाळेत बॅड टच व गुड टच संदर्भात एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेत मुलींनी त्यांच्यासोबत झालेल्या घटनेची माहिती दिली. नंतर शाळेने व इतरांनी या मुलींना विश्वासात घेऊन विचारणा केल्यानंतर नृत्य प्रशिक्षक अश्लील कृत्य करत असल्याचे सांगितले. त्यानूसार पोलिसांनी प्रकरण गांर्भियाने घेतले. तसेच, तत्काळ गुन्हा नोंदवून त्याला अटक देखील केली. पालकांनी हा प्रकार समोर आल्यानंतर शाळेच्या परिसरात मोठी गर्दी केली होती. संतप्त नातेवाईकांनी आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली. त्यांनी शाळेच्या प्रशासनाला जाब विचारला. दरम्यान, शाळेने खुलासा करत संबंधित शिक्षकावर शाळेकडून कठोर कारवाई केली असून, त्याला शाळेतून काढून टाकण्यात आले.

# शिक्षणाच्या माहेरघरात गुन्हेगारी वाढली; हडपसरमध्ये बंगला फोडला; साडेनऊ लाखांचा ऐवज पोबारा केला

पुणे । प्रतिनिधी

शहरात घरफोड्या करणाऱ्या चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला असून, हडपसर भागातील बंद बंगला फोडून चोरट्यांनी साडे नऊ लाखांचे ऐवज चोरून पोबारा केला आहे. बंगल्याची खिडकी उचकटून चोरट्यांनी आत प्रवेश केला होता. हडपसर भागातील मांजरी परिसरात घडली. याप्रकरणी प्रदीप कृष्णा शेवकर (वय ४७, रा. मातोश्री पार्क, मांजरी, हडपसर) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शेवकर यांचा मांजरीतील मातोश्री पार्क परिसरात बंगला आहे.



सोमवारी सकाळी शेवकर यांची पत्नी, आई आणि मुलगी सकाळी नातेवाईकांकडे गेले होते. शेवकर यांचे भाजीपाला विक्रीचे दुकान आहे. त्यांचा मुलगा हडपसर भागातील एका शाळेत आहे. मुलाला सकाळी शाळेत सोडून शेवकर भाजीपाला विक्री दुकानात गेले. सोमवारी रात्री शेवकर यांची मुलगी आणि भाची घरी आली. तेव्हा बंगल्याची खिडकीचे गज उचकटल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी खिडकीतून आत प्रवेश केला. बेडरूममधील कपाट उचकटून चोरट्यांनी कपाटातील गंठण, सोनसाखळी, रोकड असा साडेनऊ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे उघडकीस आले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ निरीक्षक संतोष पांढरे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस कर्मचारी कांबळे तपास करत आहेत.

दुचाकीला धक्का देऊन सोन साखळी पळविली

शहरात महिला तसेच पादचारी नागरिक व ज्येष्ठांना चोरट्यांकडून लक्ष केले जात असताना चोरट्यांनी दुचाकीवर निघालेल्या महिलेला चालत्या गाडीवर धक्का देऊन त्यांच्याकडील चार लाखांचे दागिने चोरून नेले आहेत. आळंदी रस्त्यावर ही घटना घडली. या प्रकरणी ३६ वर्षीय महिलेने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदार महिला विश्रांतवाडीतील धानोरी भागात राहायला आहेत.

महिलेच्या नात्यातील एकाचा विवाह समारंभ दिघी येथे होता. सोमवारी (१६ डिसेंबर) विवाह समारंभावरुन महिला आणि पती दुचाकीवरुन घरी निघाले होते. दरम्यान, विवाह समारंभात दागिने घालण्यासाठी त्यांनी चार लाखांचे दागिने नेले होते. विवाहात दागिने घातलेही होते. विवाह समारंभातून त्या पतीसोबत दुचाकीवर पुन्हा परत निघालेल्या होत्या. तेव्हा आळंदी रस्त्यावर बोपखेल फाटच्याजवळ रात्री पावणेदहाच्या सुमारास पाठिमागून दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी तक्रारदार महिलेकडील दागिने असलेली पिशवी चोरून नेली. चोरट्यांनी धक्का दिल्याने दुचाकीला घसरली आणि दाम्पत्य खाली पडले. सुदैवाने या घटनेत महिला आणि तिच्या पतीला गंभीर दुखापत झाली नाही. पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले तपास करत आहेत.

# पालिकेच्या 'पुस्तक घरा'तून बेघर, बेवारस होण्याची पुस्तकांवर वेळ; कर्वेनगरातील करुण घटना

पुणे । प्रतिनिधी

'शांतता पुणेकर वाचत आहेत' आणि 'पुणे पुस्तक महोत्सव ' असे कार्यक्रम प्रचंड गाजावाजाने सुरू असताना पुस्तकांसाठी असलेल्या 'पुस्तक घरा'तून पुस्तकांनाच बेघर आणि बेवारस होण्याची वेळ आली आहे. पुस्तके रस्त्यावर धूळ खात अवस्थेत पडलेली राजाराम पुलाजवळील खुस्तक घराख्रत अशी परिस्थिती दिसून आली.




पुणे महानगरपालिकेने नगरसेवकांच्या आग्रहाखातर किंवा विशिष्ट योजनांमध्ये त्यांच्या त्यांच्या वार्डामध्ये काही विशेष प्रकल्प सुरू केले आहेत. त्यातीलच एक प्रकल्प हा खुस्तक घरख्र होता. राजाराम पुलाजवळील मातोश्री वृद्धाश्रमाजवळ असेच एक खुस्तक घरख्र काही वर्षांपूर्वी थाटात सुरू करण्यात आले. त्याचे उद्धाटनही चांगल्या थाटामाटात झाले. या पुस्तक घरामध्ये हिंदी, इंग्रजी, मराठी मासिके आणि कथा कादंबऱ्या आदी काही पुस्तके शेल्फ मध्ये ठेवण्यात आली होती. पुस्तकांची देवघेव करण्यासाठी अल्पकाळ कर्मचारीही नेमण्यात आला होता. परंतु सुरू झाल्यानंतर काही दिवसातच हे खुस्तक घरख्र कुलूप बंद झाले. गेल्या काही काळामध्ये पुस्तकांवर धुळीचे थरच्या थर चढले. पुस्तक संख्या रोडावत गेली. ऊन आणि पावसाच्या माऱ्यात बिचारी उरलीसुरली पुस्तके कुजली आणि केविलवाणी होऊन गेली. त्यांची ती अवस्था पाहून रसिकांना हळहळ वाटली.

कर्वेनगर, नवसह्याद्री सोसायटीसारख्या प्रतिष्ठित भागामध्ये हे पुस्तक घर सुरू करण्यात आले होते मात्र त्याला वाचकांचाही प्रतिसाद मिळाला नसावा. दोन चार दिवसांपासून 'पुण्यात 'शांतता पुणेकर वाचत आहेत' 'पुणे पुस्तक महोत्सव ' अशा साहित्यिक उपक्रमांची गजबज असताना या खुस्तक घराख्रतील पुस्तके बेवारस अवस्थेत आणि आणखीन धूळखात रस्त्यावर पडलेली दिसून आली.

पूर्वी येथे असलेल्या पुस्तकांचे काय झाले की ती पळून गेली? की रद्दीत विकली गेली? की कोणी चोरली? या प्रकल्पावर नेमका किती खर्च झाला? खुस्तक घरख्र योजना यशस्वी करण्याची जबाबदारी नेमकी कोणावर होती त्यांनी कुचराई केली का, असा प्रश्न करदात्या जागरुक पुणेकरांना पडला आहे. आता या पुस्तक घराच्या जागी कोणता दुसरा उपक्रम सुरू होणार की 'माननीयां'साठी ती जागा अडवून ठेवली जाणार, तेथे काही भलताच धंदा सुरू होणार याविषयी नागरिकांना उत्सुकता आहे.

पुस्तक खरेदीसाठी नागरिकांची झुंबड

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सवाला सुरुवात झाली आहे. शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले असून रविवारी मोठ्या प्रमाणात पुणेकरांनी या प्रदर्शनाला भेट देत पुस्तक खरेदी केली. जगभरातील साहित्यातील पुस्तके खरेदी करण्यासाठी पुणेकरांची झुंबड उडाली आहे.

# लष्कर पोलिसांची मोठी कारवाई; प्रवाशांना लुटणाऱ्यांना घेतले ताब्यात

पुणे : पुणे शहरात लुटमार तसेच चैन व मोबाईल स्नॅचिंगच्या घटना वाढलेल्या असताना लष्कर पोलिसांनी रात्रीच्यावेळी प्रवाशांना लुटणाऱ्या तडीपार गुंडासह दोन साथीदारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, त्यांच्याकडे सखोल तपास केला जात आहे. याप्रकरणी छोट्या उर्फ अभिषेक शिवाजी आल्टे (वय २३ रा. बाबाजान चौक, लष्कर) , अमर विशाल खरात (वय १९ रा. साईबाबा मंदिरासमोर, लष्कर), जयेश गणेश भिसे (वय १९, रा. कासेवाडी, भवानी पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर, उपनिरीक्षक प्रदीप पवार, पोलीस कर्मचारी संदीप उकिर्डे, रमेश चौधर यांनी केली आहे.



तक्रारदार मुळचे लातूर जिल्ह्यातील आहेत. ते काही कामानिमित्त लातूरहून पुण्यात आले होते. लष्कर भागातून ते रविवारी (१५ डिसेंबर) निघाले होते. त्यावेळी तडीपार गुंड छोट्या, त्याचे साथीदार अमर, जयेश यांनी त्यांना अडवले. तसेच विनाकारण वाद घालून त्यांना धमकावले. नंतर त्यांच्याकडील मोबाइल चोरून तिघे पसार झाले. त्यामुळे तक्रारदार प्रचंड घाबरले होते. त्यांनी त्याही अवस्थेत लष्कर पोलीस ठाणे गाठले. तसेच, पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारदारांची अवस्था ओळखली, त्यांना धीर दिला तसेच त्यांच्याकडून चोरट्यांचे वर्णन घेतले. यानंतर पोलिसांनी तपास करुन तिघांना पकडले. आरोपींकडून दोन दुचाकी आणि मोबाइल जप्त करण्यात आला.

# ससून रुग्णालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे मदत व मार्गदर्शन केंद्र सुरु करावे' – आमदार सुनिल कांबळे

पुणे – महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पुण्यासाठी ससून रुग्णालय येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी चे मध्यवर्ती मदत व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी आमदार सुनिल कांबळे यांनी केली आहे.



पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या ससून सर्वोउपचार रुग्णालयात असंख्य गोरगरीब रुग्ण उपचारांसाठी महाराष्ट्रभरातून दाखल होत असतात, तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी च्या फॉर्म साठी लागणाऱ्या ससून शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांच्या सही शिक्क्यासाठी असंख्य रुग्णांची रांग त्याठिकाणी दररोज असते.

तरी या सर्वाचा विचार करता ससून सर्वोउपचार रुग्णालय येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे पुणे शहर व जिल्हा म्हणून एक मध्यवर्ती मदत व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावे. अशी मागणी सुनिल कांबळे यांनी केली आहे. जेणेकरून तेथे येणाऱ्या रुग्णांना योग्य ते मार्गदर्शन व मदत होईल. असं देखील ते म्हणाले आहेत.

# 'वाघोली मधील वाहतूक कोंडीचा प्रश्न विधानसभेत मांडला'; आमदार कटके यांच्याकडे ग्रामस्थांचा पाठपुरावा



वाघोली – शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार माऊली कटके यांनी वाघोली मधील सतत होणारी वाहतूक कोंडी याबाबत चे प्रश्न विधानसभेत मांडून वाघोली मधील वाहतूक कोंडी सोडवण्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याबाबतची मागणी केली आहे.

वाघोली मधील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत असून यापूर्वी देखील तत्कालीन आमदार अशोक पवार यांनी वाहतूक कोंडीबाबत लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न मांडले होते याबाबत शासन स्तरावर बैठका देखील झाल्या होत्या. परंतु वाहनांची संख्या आणि उपलब्ध मनुष्यबळ यांचा विचार करता वाहतूक कोंडीत दिवसेंदिवस भर पडत असल्याने हा प्रश्न अधिक गंभीर होऊ लागला आहे.

वाहतूक नियंत्रण समितीचे प्रमुख संपत गाडे यांनी बाह्यवळण तसेच विविध विभागांच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपाय योजना आदीबाबत पोलीस अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील यांची भेट घेऊन वाघोलीच्या वाहतुकीच्या कोंडीबाबत प्रश्न सोडवण्याची मागणी केली होती. अतिरिक्त आयुक्तांनी देखील सर्व विभागांची संयुक्तिक बैठक घेऊन हा प्रश्न सोडवणार असल्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते.

याशिवाय वाघोली मधील ग्रामस्थांच्या वतीने संपत गाडे यांनी वाघोली मधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी विधानसभेत आवाज उठवावा याबाबत ची निवेदन कटके यांना दिले होते. विधानसभेत प्रथमच शिरूर हवेली मधील बिबट्यांच्या वावराने नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल तसेच पुणे नगर रोड, पुणे सोलापूर रोड या रस्त्यांवरील वाहतूक कोंडीबाबत कटके यांनी विधानसभेत प्रश्न मांडून शासनाचे लक्ष वेधून घेतले आहे.

# पुणे रेल्वे स्थानकावर प्रीपेड ऑटो रिक्षा सुरू

पुणे : प्रवाशांकडून सातत्याने मागणी होत असल्याने पुणे रेल्वे स्थानक परिसरातील प्रीपेड ऑटो रिक्षा सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे.



रेल्वे स्थानकातील परिसरात मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला प्रीपेड ऑटो रिक्षा केंद्र स्थापन केले आहे. आतापर्यंत एक हजार २४९ रिक्षाचालकांनी नोंदणी केली असून, १८ हजारांहून अधिक प्रवाशांनी याचा लाभ घेतला आहे, तर ३१ लाखांपेक्षा जास्त व्यवहार या सुविधेमार्फत झाले आहेत.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले म्हणाले, की पुणे स्टेशनवरील प्रवासी सेवा संघाचा करार संपुष्टात आला. त्यामुळे गेल्या तीन महिन्यांपासून बंद सुविधा बंद होती. मात्र, आता ती सुरू केली असल्याने तक्रारी, वादविवादांना पूर्णत: आळा घालता येणे शक्य झाले आहे.